
MAHMARI 19358/13/1/2000 - TC



विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
# दिशा

वर्ष अठरावे / अंक ८ / ऑगस्ट २०१७

## संपादकीय

### परीक्षेतील गुणांपेक्षा अधिक महत्त्वाचे

सध्या अकरावीला प्रवेश घेण्यासाठी पालक आणि विद्यार्थी यांची धावपळ चालू आहे. वर्षभर कष्ट करून विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत जास्तीत जास्त गुण मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. तरी हव्या त्या कनिष्ठ महाविद्यालयात हव्या त्या शाखेला प्रवेश मिळेल की नाही याची खात्री नाही. दहावीच्या परीक्षेतील गुण हा एकमेव निकष प्रवेशासाठी वापरला जातो आहे. विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानलालसा किती आहे? एखाद्या शाखेत पारंगत होण्याची स्वयंप्रेरणा त्याच्यात आहे का? नवीन काहीतरी करून दाखविण्याची त्याच्यात जिद्द आहे का? या बाबींचा प्रवेशात विचार केलाच जात नाही. परीक्षेतील गुण हेच जणू बुद्धीमत्तेचे द्योतक आहेत असेच समजले जात आहे.

बुद्धीमत्तेचे अनेक पैलू आहेत हे संशोधनानी सिद्ध झालेले आहे. काही जणांना संगीतात गती असते तर काही जणांना खेळात गती असते. काही जणांच्या हातात कला असते तर काहींना देवाने गोड गळा दिलेला असतो. अशा विद्यार्थ्यांची सध्याच्या शिक्षणात हेळसांड होते. दिलेली माहिती स्मरणात ठेऊन परीक्षेच्या वेळेस ती अचूकपणे लिहिणे हे कौशल्य आहे ही बाब कोणीही नाकारीत नाही. परंतु जीवन यशस्वी करण्यासाठी हे एकच कौशल्य पुरेसे नाही. त्यासाठी जीवन कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक आहे. या दृष्टीने अनेक देशांमध्ये प्रयत्न करण्यात येत आहेत.

इसवी सन २००४ च्या फेब्रुवारी महिन्यात इंग्लंडमधून काही शिक्षक ठाण्याला आले होते. भारतीय शिक्षणाचा अभ्यास करणे हे त्यांचे उद्दिष्ट होते. त्यासाठी आम्ही त्यांना वेगवेगळ्या शाळांत घेऊन जात असू. शाळेत गेल्यावर दोन देशांच्या शिक्षकांमध्ये चर्चा होत असे. मुलांना परीक्षेत चांगले गुण मिळावेत म्हणून आम्ही काय काय करतो हे भारतीय शिक्षक तावातावाने सांगत असत. त्याचा ब्रिटिश शिक्षकांवर काहीच प्रभाव पडत नसे. ते विचारत, 'यशस्वी जीवन जगण्यासाठी या मुलांची तुम्ही कशी तयारी करून घेता?' या प्रश्नाचे उत्तर आमच्या शिक्षकांकडे नसायचे. ती जबाबदारी शाळेची नाही असेच त्यांचे मत होते. इंग्लंडमध्ये 'सिटिझनशिप एज्युकेशन' असा नवीन विषय अभासक्रमात घातला आहे. समाजात कसे वागावे याचे धडे या अभ्यासक्रमातून दिले जातात. असे काही

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

प्रयत्न भारतीय शाळांमध्ये होतात का हे जाणून घेण्याची उत्सुकता ब्रिटिश शिक्षकांमध्ये दिसायची. इथल्या शिक्षकांशी चाललेल्या चर्चेत ते हा प्रश्न उपस्थित देखील करीत असत. अर्थात आपल्याकडे असा काही प्रयत्न होत नसल्याने आपल्या शिक्षकांकडे या विषयावर बोलायला फारसे मुद्दे नसायचे. याउलट अशा शिक्षणाची आमच्या विद्यार्थ्यांना गरजच नाही असे मत आमचे शिक्षक व्यक्त करीत असत. आपल्या मताच्या पुष्टीसाठी ते भारतीय कुटुंब पद्धतीचे गोडवे गात असत. समाजात कसे वावरावे याचे शिक्षण मुलांना घरीच मिळत असल्याने त्याची काळजी शाळेने करण्याची गरज नाही असे मत अनेक शिक्षक व्यक्त करीत असत. तेरा वर्षांपूर्वी मी देखील या मताला दुजोरा देत असे. संधीचा फायदा घेऊन आमची कुटुंब पद्धती किती चांगली आणि तुमच्या कुटुंबपद्धतीचेच कसे तीन तेरा वाजले यावर भाष्य करण्याची संधी मी देखील घेतली आहे. एका तपानंतर मी मात्र या बाबीचा पुनर्विचार करू लागलो आहे. आपल्या सध्याच्या कुटुंबपद्धतीत मुलांना सामाजिक जाणिवेचे धडे खरोखरच मिळतात का? या प्रश्नाचे होकारार्थी उत्तर देणे आजच्या घडीला अशक्य आहे.

इसवी सन १९६५ साली सिंगापूरला स्वातंत्र्य मिळाले. त्यानंतर ली क्युआन यू यांच्या नेतृत्वाखाली सिंगापूरने देशाची शिक्षण प्रणाली ठरविली. यात अर्थातच गुणवत्तेला झुकते माप दिले गेले आणि परीक्षेतील गुण हेच गुणवत्तेचे मोजमाप धरण्यात आले. त्याचा फायदा देशाला झाला. देशाने औद्योगिक क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती केली. परंतु समाज विस्कटत गेला. त्यांच्या आता लक्षात आले की विद्यार्थ्यांना परीक्षार्थी बनविणारे शिक्षण कुचकामी आहे. परीक्षेच्या तयारीबरोबरच त्यांना जीवनातील समस्या सोडविण्यासाठी तयार करणे आवश्यक आहे हे त्यांनी आता ताडले आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदके मिळविण्यापेक्षा मुलांनी चांगला नागरिक म्हणून जगणे अधिक महत्त्वाचे आहे असा विचारप्रवाह सिंगापूरमध्ये पसरू लागला आहे. यादृष्टीने प्रयत्न करण्यासाठी सिंगापूर व्यवस्थापन संस्थेची अनेक वर्षे धुरा वाहिलेल्या संचालकाची शिक्षण खात्यात नेमणूक केली आहे. समाजाचा विकास आणि देशाचा विकास करण्यासाठी प्राणपणाला लावणारी जनता निर्माण करण्यासाठी कोणती शिक्षण प्रणाली असावी यावर ते सध्या काम करीत आहेत. आपल्याला देखील असाच विचार करण्याची गरज आहे हे आवर्जून सांगावेसे वाटते.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

●●●

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

व्ही.पी.एम्.

# दिशा

विद्या प्रसारक मंडळ स्थापना ● नौपाडा ठाणे ● १९३५



**वर्ष अठरावे/अंक ८/ऑगस्ट २०१७**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २२ वे/अंक २ रा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*



| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | शांघायचे विज्ञान आणि तंत्रज्ञान केंद्र | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | मूल्यवेध-६ : संवाद सहजता | श्री. नरेंद्र गोळे | ६ |
| ४) | नर्मदा परिक्रमा (भाग : ५) | श्री. अरविंद ओक | १० |
| ५) | अमेरिकेचे वसाहतीकरण, स्वातंत्र्य युद्ध व जॉर्ज वॉशिंग्टन | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | १३ |
| ६) | प्रेम रुळतसे बोलता ... | श्री. अरविन्द दोडे | २८ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | ३२ |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# शांघायचे विज्ञान आणि तंत्रज्ञान केंद्र

*शांघाय शहरात एक माहितीपूर्ण असे विज्ञान आणि तंत्रज्ञान केंद्र आहे. २००१ साली सुरू झालेल्या या केंद्राची इमारत तर आकर्षक आहेच; त्याचबरोबर त्यातील प्रतिकृती देखील आकर्षक पद्धतीने मांडलेल्या आहेत. या केंद्राचा हा थोडक्यात परिचय – संपादक*

'चीन विज्ञान आणि तंत्रज्ञान संघटना' दरवर्षी शाळकरी मुलांसाठी विज्ञान स्पर्धा आयोजित करते. या स्पर्धेत सहभागी होण्याचे निमंत्रण 'विद्या प्रसारक मंडळा'ला येते. २०१६ सालच्या ऑगस्ट महिन्यात शांघाय शहरात ही स्पर्धा भरली होती. त्या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी सहा जणांचा एक चमू शांघायला गेला होता. शांघाय हे अतिशय प्रगत असे शहर आहे. तेथे बघण्यासारखी अनेक ठिकाणे आहेत. त्यातील एक महत्त्वाचे ठिकाण म्हणजे विज्ञान आणि तंत्रज्ञान केंद्र हे होय. २००४ साली मी पहिल्यांदा शांघायला गेलो होतो तेव्हा मी या केंद्रात गेलो होतो. भेट देण्यासाठी हे एक उत्तम ठिकाण आहे असे त्यावेळी माझे मत झाले होते. त्यामुळे संधी मिळताच या ठिकाणाला पुन्हा एकदा भेट द्यायची असे मी माझ्या मनाशी ठरवून ठेवले होते. अशी संधी मला मागील वर्षी ऑगस्ट महिन्यात मिळाली. विज्ञान प्रदर्शनाच्या कामातून वेळ काढून मी तेथे जाऊन आलो. हा लेख त्याच भेटीवर आधारलेला आहे.

आमचे राहण्याचे ठिकाण आणि विज्ञान केंद्र या दोन ठिकाणातील अंतर बरेच आहे. परंतु त्याची काळजी करण्याची गरज मला भासली नाही. याचे कारण शांघाय शहराची वाहतूक-व्यवस्था अतिशय उत्तम आहे. जमिनीखालून जाणाऱ्या मेट्रोचे जाळे त्यानी चांगले विणले आहे. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी लवकर जायचे असेल तर मेट्रोला पर्याय नाही. मी देखील तोच मार्ग पत्करला. आमच्या राहत्या ठिकाणापासून जवळ असलेल्या स्टेशनला जाऊन मी मेट्रो पकडली आणि सेंट्रल पार्क स्टेशनवर पोहोचलो. तेथून जवळच विज्ञान तंत्रज्ञान केंद्र आहे. पायी चालत केंद्राजवळ पोहोचलो. प्रवेशाचे तिकीट घेऊन आत प्रवेश केला.



**विज्ञान केंद्राचे प्रवेशद्वार**

१९८० च्या दशकात चीनने देशात वैज्ञानिक साक्षरतेचा प्रसार करण्याचे ठरविले. त्यासाठी देशातील अनेक महत्त्वाच्या शहरांमध्ये विज्ञान केंद्र उभारण्याचे त्यानी ठरविले. शांघाय हे त्यावेळेस एक लहानसे खेडे घेतले होते. परंतु या गावाजवळ असलेल्या औद्योगिक क्षेत्रात जगातील अनेक महत्त्वाचे उद्योग आल्याने या शहराला महत्त्व प्राप्त झाले. आधीचे शांघाय पू नदीच्या पश्चिमेला वसलेले होते. नवे शांघाय पू नदीच्या पूर्वेला विकसित झाले. त्याला पूडाँग असे नाव आहे. पू हे आधी सांगितल्याप्रमाणे नदीचे नाव आहे आणि डाँग याचा अर्थ 'पूर्व' असा आहे. याच भागात विज्ञान केंद्राची निर्मिती केली आहे. ज्या केंद्राच्या इमारतीजवळ मी उभा होतो त्या इमारतीचे उदघाटन २००१ साली करण्यात आले. हे केंद्र अनेक मजल्यांवर विखुरले

असून त्यात अनेक विभाग आहेत. त्यातील जवळच्याच एका विभागात मी प्रवेश केला. हा विभाग शांघाय हे शहर ज्या युन्नान प्रांतात येते त्या प्रांताची माहिती देतो. त्या प्रांतातील जमीन, वनस्पती, प्राणी या सगळ्या बाबींची इत्थंभूत माहिती या विभागात मिळते. माझ्याकडे वेळ मर्यादित असल्याने आणि इतर विभाग पाहण्याची माझी इच्छा असल्याने मी या विभागातून लवकरच बाहेर पडलो. त्याआधी काही फोटो काढायला मी विसरलो नाही.



**युन्नान प्रांतातील पक्षी**

चीनने अंतरिक्ष संशोधनात चांगलीच मजल मारली आहे. त्या प्रगतीचा आढावा घेणारा एक विभाग केंद्रात आहे. या देशाने वेगवेगळे उपग्रह अवकाशात सोडले आहेत. त्या उपग्रहाच्या प्रतिकृती केंद्रात ठेवलेल्या आहेत. प्रत्येक प्रतिकृतीजवळ त्या उपग्रहाची थोडक्यात माहिती चिनी आणि इंग्रजी भाषेत लिहिलेली आहे. उपग्रहाच्या प्रतिकृती बरोबरच ज्या अग्नीबाणांच्या मदतीने त्यांचे उड्डाण करण्यात आले त्यांच्या प्रतिकृती देखील केंद्रात ठेवलेल्या आहेत. प्रत्येक प्रतिकृतीजवळ त्याची वैशिष्ट्ये सांगणारी माहिती आहेच. या विभागाला भेट देऊन देशाने अंतरिक्ष विज्ञानात किती प्रगती केली आहे याची चांगलीच कल्पना आपल्याला येते.

विज्ञान केंद्रात एक भाग प्रसिद्ध वैज्ञानिक आणि त्यांचे कार्य यांची माहिती देण्यासाठी राखून ठेवला आहे. या विभागात आयझॅक न्यूटन, अल्बर्ट आईंस्टाईन,



**अंतरिक्ष यान**

चार्लस डार्वीन, मॅक्स प्लॅन्क, मॅरी क्युरी इत्यादी शास्त्रज्ञांची चित्ररूपात माहिती दिलेली आहे. शास्त्रज्ञांची माहिती अर्थातच चिनी आणि इंग्रजी या दोन भाषांमध्ये दिलेली आहे. या विभागात एक गोष्ट सहज लक्षात येते ती म्हणजे माहितीचे सादरीकरण. ते अतिशय कल्पकतेने केलेले आहे. खालील चित्रावरून त्याची कल्पना येईल. या चित्रात धातूच्या तबकडीवर आयझॅक न्यूटन या शास्त्रज्ञाच्या कामाची माहिती दिलेली आहे. माहिती मोजकीच पण प्रभावीपणे मांडण्यात आली आहे.



**आयझॅक न्यूटनची माहिती देणारी तबकडी**

संदेश वहनाच्या क्षेत्रात चीनने नेत्रदीपक अशी प्रगती केली आहे. टेलीफोनचे जाळे देशात सर्वत्र विणलेले आहेच. वेगवेगळ्या प्रकारचे मोबाईल या देशात बनविले जातात. त्यातील बरेचसे मोबाईल परदेशात विक्रीसाठी पाठविले जातात. असे जरी असले तरी देशातील लोक देखील या यंत्रांचा मोठ्या प्रमाणावर वापर करतात.

तोंडचे शब्द विरून जातात; पण लिहिलेला शब्द टिकून राहतो. - डब्ल्यू. कॅक्सटन

देशाच्या दूरदूरच्या भागात भ्रमणध्वनी यंत्राचा वापर करता येतो. दूरचित्रवाणीचा देखील असाच प्रसार झाला आहे. त्यांच्याकडे आपल्या देशात आहेत तेव्हढ्या वाहिन्या नाहीत. तथापि ज्या वाहिन्या आहेत त्या सगळ्या देशभर पाहता येतील याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यासाठी भूस्थीर कक्षेत उपग्रह फिरत ठेवण्याची त्यांनी तजविज केली आहे. त्याचबरोबर इंटरनेटची सुविधा देखील देशभर मिळेल याची व्यवस्था त्यांनी केलेली आहे. या प्रगतीचा आढावा या विभागात घेतलेला आपल्याला आढळतो. या विभागाचे एक वैशिष्ट्य म्हणजे तेथे असलेला व्हिडियो कॅमेरा. आपण जर या कॅमेऱ्यापुढे उभे राहिलो तर तिथे ठेवलेल्या टी व्ही मध्ये आपण स्वतःला पाहू शकतो.



संदेशवहन विभागातील एक दृश्य

मी जेव्हा संदेशवहन विभागात होतो तेव्हा बाजूच्या एका विभागात बरीच गर्दी असल्याचे माझ्या लक्षात आले. म्हणून मी तिकडे प्रस्थान केले. तिथे गेल्यावर मला गर्दीचे कारण कळले. तो विभाग रोबोंचा होता. तेथे वेगवेगळ्या प्रकारचे रोबो ठेवलेले होते. काही रोबो एका ठिकाणी ठेवलेल्या वस्तू उचलून दुसऱ्या ठिकाणी ठेवत होते. काही रोबो शरीराच्या वेगवेगळ्या हालचाली करून दाखवीत होते. काही रोबो तर चक्क गाण्यावर नाच करीत होते. एक रोबो पियानोवर संगीत वाजवीत होता. त्यामुळे त्यांच्या पुढे मोठी गर्दी होती.



पियानो वाजवणारा रोबो

या विज्ञान केंद्राचे एक वैशिष्ट्य असे की तिथे लहान मुलांसाठी एक वेगळा विभाग आहे. तिथे येऊन मुले खेळ खेळू शकतात आणि त्या खेळांमध्ये कोणते विज्ञान दडलेले आहे ते समजावून घेऊ शकतात. तिथे अनेक संगणक ठेवलेले आहेत. या संगणकांशी आंतरक्रिया करून विद्यार्थी वेगवगळ्या विषयांची माहिती घेऊ शकतात. त्यांना काही मदत लागलीच तर ती करण्यासाठी तज्ज्ञ उपलब्ध करून दिलेले आहेत. एव्हढी चांगली सुविधा असताना विद्यार्थी गर्दी करणार नाहीत असे होणारच नाही. हा भाग सतत गजबजलेला असतो असे मला तिथे असलेल्या व्यक्तीने सांगितले.



माहिती मिळविण्यासाठी धडपड करणारे विद्यार्थी

मी सुरुवातीलाच सांगितले की या विज्ञान तंत्रज्ञान केंद्रात अनेक विभाग आहेत. त्यामध्ये दळणवळण, धातू निर्मिती आणि उपयोग, जीवाश्म अशा अनेक

(पृष्ठ क्र. ९ वर)

# मूल्यवेध-६ : संवाद सहजता

*संवाद सहजता मानवी आयुष्याला साफल्याच्या तीरावर नेण्याचे प्रभावी साधन आहे. तिचा भरपूर उपयोग करा. 'बोला. बोलके व्हा! बोलते व्हा!' हे या लेखात विशद केले आहे - संपादक*

सहजगत्या संवाद साधता येणे ही एक कलाच आहे. ती अवगत झाली तर मनुष्यजीवनाचे चीज होते. अन्य प्राणी आणि मनुष्य ह्यातील मुख्य फरक म्हणजे मनुष्यजीवनातील पूर्ण विकसित झालेली भाषा होय. एका व्यक्तीला असाध्य असते, जे केवळ समूहजीवनात साध्य होऊ शकत असते असे प्रगत राहणीमान, त्या भाषेच्या माध्यमातूनच आकाराला येत असते. तिच्याच आधारे, परस्परांच्या प्रेरणा, उद्दिष्टे आणि कृती ह्यांचा परस्परांशी मेळ साधून महानगरे वसवली जातात, साम्राज्ये उदयास येतात आणि आधुनिक मान्यतांना अनुसरून, लोकशाही तत्त्वांबरहुकूम राज्य चालते. तसेच, अवनीवरील इतर प्राण्यांना विस्मयचकित करून सोडणारे आयुष्य मनुष्यमात्रांना सहज शक्य होत असते.

शारीरिक बळाच्या आधारे स्वसंरक्षण साधता येत असले तरी, व्यवस्थेची निर्मिती केवळ बळाच्या आधारे संभवत नाही. त्याकरता बुद्धिमत्ता लागत असते. बुद्धिजीवींच्या संरक्षणाकरता मात्र तत्कालीन शारीरिक बळाचा आधार लागत असतो. अशाचप्रकारे शारीरिक, बौद्धिक, सांगीतिक, व्यावहारिक, भाषिक, कलाकौशल्यात्मक, तसेच व्यक्ती-समष्टीसंबंधांसापेक्ष अशा सात प्रकारच्या मानवी प्रज्ञांना आणि त्यांच्या धारकांना; विकासाची संपूर्ण संधी मिळवून दिल्यासच सामर्थ्यशाली प्रगत मानवी जीवन उदयास येऊ शकते. त्याचा लाभ मग त्यात अंतर्भूत असलेल्या प्रत्येक घटकास होऊ शकत असतो. ह्यातील भाषिक क्षमतेचा लाभ, इतर सगळ्याच प्रज्ञाधारकांनाही होतच असतो. किंबहुना भाषिक क्षमता नसल्यास, आपल्या इतर क्षमतांचा विकास साधणेही दुरापास्त होऊन जाते. मूक-बधिरांचा विकास मंद होतो, त्याचे कारणही हेच असते. मात्र अशा व्यक्तींतील इतर प्रज्ञांचा पुरेपूर लाभ समूहजीवनास व्हावा, ह्या उद्देशानेच मग चिन्हस्वरूप भाषा, ब्रेलसारख्या सांकेतिक लिपी ह्यांची निर्मिती झालेली आहे.

व्यावहारिक गरजांच्या देवाणघेवाणीस आवश्यक असणारे संवाद, भावनिक जवळीक साधणारे संवाद, सहानुभूतीदर्शक संवाद, आविष्कार वर्णनार्थ होणारे संवाद, अनुभव निवेदनार्थ होणारे संवाद हे तर नेहमी होतच असतात. मात्र, संवादास प्रवृत्त करणारे सूचक बोल, सहज संवाद साधता येण्याच्या कौशल्याचा भाग असतात. किमान मानवी अभिव्यक्तींद्वारा समोरच्यास आपल्या मनातील विचार अवगत करून देण्याचे तंत्र अतिशय प्रभावशाली असते. संवेदनार्थ आपल्या सर्वच ज्ञानेंद्रियांचा यथेच्छ वापर केल्यास संवाद अधिकच प्रभावी बनवता येतो. ह्याचेच एक उदाहरण, अंदमानी समुद्रतळातील वाटचाली दरम्यान मला अनुभवता आले.

साधारण जहाजाच्याच आकाराच्या गोलाकार समुद्राला, तरत्या गोलकांच्या आधारे तळापर्यंत लोंबणारे जाळे लावून बंदिस्त केलेले असते. जहाजावरून एक लोखंडी शिडी तळापर्यंत उतरवलेली असते. तिच्यावरून समुद्राकडे पाठ करून, नेसत्या कपड्यांनिशी आपण दोन चार पायऱ्या उतरून तळाकडे निघालो, म्हणजे गळ्यापर्यंत पाण्यात शिरल्यावर, ३२ किलो वजनाचे हवेशीर, म्हणजे पाठीमागच्या बाजूने दाबित हवेची नळी जोडलेली असते असे शिरस्त्राण आपल्या डोक्यावर चढवले जाते. जहाजावर एक मोठ्ठा हवादाबक (कॉंप्रेसर) असून त्यातून दाबित हवा आणणाऱ्या सुमारे एक सेंटिमीटर व्यासाच्या

माणसाची शैली हीच त्याच्या मनाची वाणी. - इमरसन

लांबलचक (पन्नास, शंभर मीटर लांबीच्या असाव्यात) नळ्या शिरस्त्राणास जोडलेल्या असतात. अगदी चष्मा घालूनही हे शिरस्त्राण चढवले जाते. कारण शिरस्त्राणाच्या आतील भाग कोरडाच राहत असतो, शिवाय चष्मा घातल्याने आपण नेहमीसारखेच स्वच्छ पाहूही शकत असतो. शिरस्त्राणाचे आकारमान असे असते की, त्याचे पाण्यातील वजन केवळ ७ किलोच भरते. मात्र ह्या ७ किलोच्या अतिरिक्त वजनामुळेही आपण सागरतळाकडे लोटले जाऊ लागतो. अशावेळी, सोबत करत असलेला पाणबुडा आपल्याला शिडी सोडायची खूण करतो आणि ती सोडताच आपण त्याचा हात धरून झपाट्याने सागरतळाशी पोहोचतो. इथे सागरतळ साधारणपणे ५ मीटर म्हणजे सुमारे १५ फूट खोल असतो. अर्थात हवेची नळी कायमच हवादाबकाला जोडलेली राहून आपल्याला दाबित हवेचा पुरवठा करत राहते. शिरस्त्राणाच्या आतील हवेच्या दाबाने बाहेरचे पाणी शिरस्त्राणामध्ये शिरू शकत नाही. आपण बाहेरच्यासारखाच सुखाने श्वासोच्छ्वास करत राहतो.

माझ्या पाठीमागे उभा आहे तो आहे आमचा मार्गदर्शक पाणबुड्या. समुद्रसंचार करणाऱ्या आठ-दहा संचारकर्त्यांमागे तीन पाणबुडे सोबत असतात. आमचा गट आठ जणांचा होता. आमच्याच सोबत पर्यटन करणारे पाच जण आणि नवरा, बायको व त्यांचा सुमारे दहा वर्षांचा एक मुलगा असे इतर तिघे बंगाली भाषक ह्यांचा हा गट होता. तळाशी पोहोचल्यावर संचार कर्त्यांची हातात हात देऊन एक माळ तयार केली जाते. त्या माळेच्या एका टोकास एक, तर दुसऱ्या टोकास दुसरा पाणबुडा हाती धरून मार्गदर्शन करत असतो. काय करायचे आहे ते खुणेनी समजावून सांगण्याचे त्यांचे कसब मला फारच अपूर्व भासले. आवडले. तिसरा पाणबुडा जलगच्च प्रकाशचित्रकाने (वॉटरटाईट कॅमेऱ्याने) संचारकर्त्यांचे फोटो काढत असतो. आपण बाहेर येऊन कपडे बदलेपर्यंत अशा प्रत्येकी १२ फोटोंची एक सी.डी.ही तयार करून आपल्या हाती देत असतात.

आत शिरण्यापूर्वी आम्हाला आठ जणांना एकत्र करून जहाजावरील एका ज्येष्ठ खलाशाने एक पाच मिनिटांचे व्याख्यान दिले. आपण 'सुंदर आहे' असे दाखविण्यासाठी करतो ती हस्तमुद्रा; मला जमते आहे. मी स्वस्थ आहे. आता समुद्रसंचार करू या' असे सोबतच्या पाणबुड्यांना सांगण्याकरता वापरावी असे सांगण्यात आले. तसेच उजव्या हाताचा अंगठा वरच्या दिशेने दाखवल्यास; ''मला ताबडतोब बाहेर काढा. अस्वस्थ वाटते आहे असा अर्थ सोबतच्या पाणबुड्यांना कळेल आणि ते तुम्हाला तत्काळ बाहेर काढतील'',



जी शपथ जास्त बद्ध करू पाहते, ती तुटल्याशिवाय राहत नाही. - टेनिसन








असेही सांगण्यात आले. मात्र ह्या व्यतिरिक्त इतर कुठल्याही हावभावांना आणि खुणांना समुद्रसंचारासंदर्भात काहीही अर्थ नाही, असे बजावून सांगण्यात आले.

आता आमच्यासोबतच्या एका महिलेस, भफ्लोट होत आहेत* ह्या कारणास्तव बाहेर काढण्यात आले. त्यांचे म्हणणे असे होते की, 'मला चांगले जमते आहे' ह्या अर्थाने त्यांनी उजव्या हाताचा अंगठा वर करून दाखवला. मात्र आधीच सांगितल्याप्रमाणे ही खूण चुकीची ठरल्याने त्यांना बाहेर काढले गेले. इथे हे नमूद करावे लागेल की, सागरतळाशी अशा शिरस्त्राणासह वावरत असतांना, आपले पाण्यातले वजन कमी भरत असल्याने, चालण्याकरता हलकेच पाऊल उचलले तरी, उडी मारल्यासारखे शरीर वर उसळत असते. अशा परिस्थितीत जमिनीवर पावले रोवून ठेवणे आणि ताठ, सरळ उभे राहणे अत्यंत जरूर ठरते. कारण ह्या उसळीचा आपल्याला अंदाज यायला जरासा वेळच लागतो. शिवाय आपण खाली वाकलो तर शिरस्त्राणात पाणी शिरून आपल्याला बुडण्याचा धोका संभवतो. एका पाणबुड्यास तीन-चार संचारकर्त्यांवर लक्ष ठेवायचे असल्याने आणि त्याचेवर त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी असल्याने, अशा प्रकारे अस्थिर होणाऱ्या व्यक्तीस बाहेर काढणे त्यांना क्रमप्राप्तच ठरत असणार.

अशा परिस्थितीत संचारकर्ता घाबरतो आहे का? त्याला काही त्रास तर होत नाही ना? हे पाहण्याचे पाणबुड्यांचे कर्तव्यच होते. संचारकर्त्यांच्या हातापायांच्या हालचाली आणि देहबोलीवरून त्यांना सतत बरेच काही समजत होतेच. मात्र प्रत्यक्ष संचारकर्त्यांशी संवाद साधणे शिरस्त्राणाच्या काचेतून त्यांच्या डोळ्यांत पाहिल्याशिवाय शक्य होत नसे. पाणबुडे अशावेळी त्या काचेसमोर येऊन हातवारे करून, खुणा करून संचारकर्त्याची प्रतिक्रिया आजमावत असत. आपल्याच हातांना एकमेकांत गुंतवून दाखवून, संचारकर्त्यांनी परस्परांचे हात घट्ट धरून ठेवावेत असे ते आम्हाला सांगत असत. आम्हाला ते कळतही होते आणि आम्हाला त्यांचे म्हणणे समजल्याचे, त्यांना आमच्या डोळ्यांतून व्यक्त होणाऱ्या भावांनीच समजून घ्यावे लागत असे. एका पाणबुड्याने स्वतःच्या हातात ब्रेडचे तुकडे घेऊन ते मी त्याच्या हातातून घेऊन माशांना द्यावेत असे मला डोळ्यांनीच सुचवले. मी ते त्याच्या हातातून घेतले, समोरच्या प्रवाळांवर विहरणाऱ्या मोठ्या माशाला ते देऊ केले. त्याने माझ्या हातातून ते जवळपास हिसकावूनच घेतले. मग पाणबुड्याने शिरस्त्राणाच्या काचेतूनच आम्हाला समुद्रतळातील एका पायवाटेवरून चालण्याचा निर्देश दिला. आम्हीही गुमान तसे चालू लागलो. त्या वेळेचे ते सुखसंवाद मला अत्यंत संस्मरणीय वाटतात. कमीत कमी शब्दांत, छे, केवळ हावभावांतून ईप्सित संदेश सोबतच्या व्यक्तींना सांगणे कसे शक्य आहे ह्याचा तो वस्तुपाठच होता.

त्यामुळे आपले हावभाव, आपली देहबोली, आपले शब्दही खूप बोलके असावेत. अनेकदा आपण आपली अभिव्यक्ती रोखून धरत असतो. त्यामुळे सहज संवाद होण्यात अडथळे उद्भवतात. कवी 'नामानिराळा' म्हणतातः

सद्गुणी माणसाला फारसे मित्र नसतात. - शेक्सपीअर

काय नुसते वाचता? प्रतिसाद द्या,
हातचे राखून द्या, पण दाद द्या ।
आंधळ्यांची दिव्यदृष्टी व्हा तुम्ही,
अन् मुक्यांना नेमके संवाद द्या ।।
– नामानिराळा, मनोगत डॉट कॉम २००५०६१४

प्रतिसाद काय केवळ वाचेनेच देता येतो? तो तर नजरेने, स्पर्शाने, हावभावांनी, कशानेही दिला जाऊ शकतो. बोलके व्हायचे ठरवले तर, आंधळ्यांना दिव्यदृष्टी देणे आणि मुक्यांना बोलके संवाद देणे मुळीच कठीण नाही.

मात्र कुसुमाग्रजांच्या एका कवितेतल्याप्रमाणे जर तुम्हाला, 'काही बोलायाचे आहे, पण बोलणार नाही', अशा प्रकारे वागायचे असेल, तर मग समोरच्यांशी संवाद कसा बरे साधला जाऊ शकेल? याउलटः

'गोमू संगतीनं, माझ्या तू येशील का? माझ्या पिरतीची राणी तू होशील का?'

'राजा संगतीनं तुझ्या मी येणार हाय, तुझ्या पिरतीची राणी मी होणार हाय!'

ह्या संवादात आपल्याला अर्थपूर्ण संवादाचे एक ओळखीचे उदाहरण दिसून येईल.

तेव्हा हे जाणून असा की, संवाद सहजता मानवी आयुष्याला साफल्याच्या तीरावर नेण्याचे प्रभावी साधन आहे. तिचा भरपूर उपयोग करा. बोला. बोलके व्हा! बोलते व्हा!!

**– नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) – ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

•••

(पृष्ठ क्र. ५ वरून - **शांघायचे विज्ञान आणि तंत्रज्ञान केंद्र)**

विभागांचा समावेश आहे. वेळ कमी असल्याने या सर्व विभागांना मी धावती भेट दिली. प्रत्येक विभाग माहितीने परीपूर्ण असून चांगला सजविलेला आहे. मोठ्या संख्येने चिनी लोक ती माहिती घेत होते. त्यांच्याबरोबर काही विदेशी पर्यटक देखील या केंद्रात होते.

विज्ञान आणि तंत्रज्ञान केंद्राच्या भेटीत मला सर्वात आवडलेली गोष्ट म्हणजे देशात कार्यरत असलेल्या शास्त्रज्ञांची माहिती. शांघाय आणि इतर शहरातील संशोधन संस्थांमधून जे शास्त्रज्ञ काम करीत आहेत त्यांचे मोठ्या आकाराचे फोटो या केंद्रात लावलेले आहेत. त्याचबरोबर त्यांची नावे आणि त्यांच्या संशोधनाचा विषय याची माहिती देखील तिथे दिलेली आहे. त्यातून सहजिकच संशोधनाकडे वळण्याची प्रेरणा पुढच्या पिढीला मिळते. या महत्त्वाच्या ठिकाणी आपला फोटो असलाच पाहिजे असे मला वाटले म्हणून तेथे असलेल्या एका चिनी माणसाच्या हातात माझा कॅमेरा देऊन मी फोटो काढून घेतला. माझ्या संग्रही असलेला हा दुर्मिळ फोटो खाली देत आहे.



**चिनी शास्त्रज्ञासोबत काढलेला फोटो**

**- डॉ. सुधाकर आगरकर**
सी–१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण–शीळ रोड, काटई, ता. कल्याण,
जि. ठाणे – ४२१२०४

# नर्मदा परिक्रमा

**भाग : ५**

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत – संपादक*

**दिवस ७ वा : गुरुवार २८/११/२०१३**

छात्रावासाची ५० मुले इथे असावीत. भोजन व निवास निःशुल्क असावे. सर्व मुले बहुधा एकाच शाळेत परंतु वेगवेगळ्या इयत्तांमध्ये वयानुसार शिकतात. शाळेसाठी बाहेर जावे लागते. ती आश्रमाची नाही.

समोरच भव्य, अति भव्य असे कल्याणी कन्यका विद्यालय आहे. संस्थेची इमारत एखाद्या राजवाड्याप्रमाणे शोभिवंत गुलाबी रंगाची आहे.



घुमटावर देवता, ऋषिमुनी यांच्या मूर्ती दिसल्या. सर्वधर्मसमभाव म्हणजे हिंदू प्रतीके बाद करणे असा आचरटपणा केंद्रीय विद्यालय असून दिसत नाही.

**अमरकंटक –** घनदाट अरण्याने वेढलेले अमरकंटक हे स्थान नर्मदा–पश्चिम वाहिनी व शोण–पूर्व वाहिनी या दोन नदींचे उगमस्थान आहे. नर्मदा मंदिर म्हणून जो उगम मानला जातो त्याहून वेगळा जवळच असलेल्या पंचमंदिर समूहाजवळ असलेला चौकोनी कुण्डवजा. मोठा जलाशय शंकराचार्यांनी उद्गम म्हणून मानला व पातालेश्वराची तिथे स्थापना केली असे मला तेथील सुरक्षा रक्षकाने सांगितले.




**अमरकंटक :**

अक्षांश २२° ४'३३'', रेखांश : ८१° ५४ (पूर्व) सागरपातळीपासून उंची १०६०.७ मीटस, वर्षाऋतु १५ जून ते सप्टेंबर, शीत ऋतु ऑक्टोबर ते फेब्रुवारी तापमान कमाल ३२°c किमान ९६°c ग्रीष्म ऋतु फेब्रुवारी ते १५ जून तापमान कमाल ३२°c किमान ९६°c, ग्रीष्म ऋतु ऑक्टोबर ते फेब्रुवारी तापमान कमाल २३°c किमान ०° भाषा : हिन्दी बघेलखण्डी, उत्तम ऋतु : ग्रीष्म ग्रामीण मेळा : महाशिवरात्र पर्व, वैशाखी पौर्णिमा, नर्मदा जयंती.

सकाळी स्नानासाठी घाटावर गेलो होतो.

काल आणि आज मिळून आवश्यक ते सर्व कपडे साबणाने धुतले. पूजा करून बाहेर पडलो. देशपांडे भेटले नाहीत. संरक्षित मंदिर समूह पाहिला, भरपूर फोटो काढले. नंतर सोमभद्र नदीचा उगम पाहिला. उगम पाहून झऱ्याच्या रुपात हा थोडा वाहात जाऊन पूर्वेला खोल दरीत कोसळतो.

या विश्वामध्ये सद्गुणी लोक नेहमीच हाताच्या बोटांवर मोजण्याइतके आढळतात. – रॉबेसपीअर

त्यामानाने एक किलोमीटर अंतरावर उगम पावणारी नर्मदा रुंद प्रवाहाने इथे तरी संथ वाहताना दिसते.

देशपांड्यांना दोन दिवसांवर मृत्यूंजय आश्रमात राहता येणार नव्हते. परंतु आश्रमाने स्वतःच त्यांना तशी परवानगी दिली. हेच सांगण्यासाठी ते कल्याण आश्रमात येऊन गेले होते, ज्यावेळी मी सोमभद्र दर्शनासाठी बाहेर होतो. अर्थात जाताना मीही त्यांच्या आश्रमात डोकावले होते. पण ते भेटले नव्हते.

भोजनासाठी जरा लगबग झाली. कारण मी परत येईतो १२ वाजून गेले होते आणि ११ ही सकाळी जेवणाची आश्रम वेळ आहे. सकाळी ११ व संध्याकाळी ७ ची आरती, भजन आटोपल्यावर. म्हणजे ८ नंतर.

भोजनानंतर जाऊन देशपांड्यांना भेटलो. बऱ्याच गप्पा झाल्या. संध्याकाळी जैन दिगंबरांचे एक भव्य व सुंदर मंदिर उभारणीचे काम सुरू आहे (गेली १३ वर्षे) ते पाहून आलो. वजनदार गुलाबी दगड (खडक) इथे आणून त्यावर त्यांना आकार देऊन नक्षीकाम कोरणे, आणि दगड कुठून येतो (बहुधा राजस्थान) माहीत नाही पण कारागीर मात्र राजस्थानी आहेत. ड्रिल मशिनने आकार देऊन छिन्नीने ते परिपूर्ण केले जाते. मंदिरावर दगड चढविण्यासाठी रेलवर चालणारी प्रचण्ड क्रेन लावलेली आहे. दोन रुळांमध्ये मंदिरापेक्षा अधिक अंतर आहे.



हजारो वर्षांपूर्वी अशीच भव्य मंदिरे उभारली गेली. तेव्हा आधुनिक साधने नव्हती. मात्र तीच कलाकारी आजही आहे हे सत्य आहे.

उद्या सकाळी लवकर जावे या विचाराने आजच आरतीच्या अगोदर रु.३००/- डोंबिवलीवासी नावाने देणगी स्वरूपात दिले. व्यवहारी हिशेबाने दिले असल्याने ते दान म्हणता येणार नाही. इथे खोल्या भाड्याने दिल्या जात नाहीत. भोजन चहासह सर्व निःशुल्क. परंतु सभासदांना प्राधान्य नंतर त्यांच्या ओळखीने आलेल्यांना व शेवटी उपलब्धी असेल तर इतरांना. तरीही सर्व ऐच्छिक! शुल्क नाही.

साधुसंतांसाठी स्वतंत्र व्यवस्था आहे. आरतीनंतर भजने म्हणतात, एका सुरात. परंतु शब्द मात्र कळत नाहीत. आपल्या टाळकरी भजनांसारखी कर्णकटु नाहीत पण दोन्ही बाबतीत, कळत नाहीत कारण नीट ऐकू येत नाहीत हे मात्र खरे!

देणगी देऊन घाईघाईने नर्मदाकुंडाची आरती पाहण्यासाठी गेलो. दीपदान असते असे चौबळांकडून कळले होते. परंतु काही विशिष्ट तिथींना सोडून हे होत नाही आणि आज फक्त एकच दिवा ऐच्छिक पाण्यात सोडला होता.

कुण्डातील पाण्यातून सातत्याने फुले, अक्षता इ. तरंगता कचरा काढला जातो. (पाणी पिऊ नये) 'आचमनच करावे' असा फलक लावलेला आहे.

कॅमेरा, बॅटरी व मोबाईल बॅटरी पूर्ण भरून घेतली. मोबाईलचा ऑन ऑफ स्विच नीट काम करीत नाही हे लक्षात आले होते, पण आता फोन ऑफ होईना. बॅटरी बाहेर काढण्याची चूक करायला नको होती. कारण पुन्हा बॅटरी लावली तरी आपोआप ऑफ झालेला फोन स्विच दाबल्याखेरीज चालू होत नाही.

फोन चालू राहिला असता तरी परवडले असते हे कळून काय उपयोग? बॅटरी बाहेर काढायच्या आधी हे करायला हवे होते.

बरीच खटपट केली, शेवटी स्वतःला दोष देत मोबाईल ठेवून दिला.

**दिवस ८ वा : शुक्रवार २९/११/२०१३**

सकाळी लवकर आश्रम सोडला (६.१५) देशपांडे यांना गाठून, फोनवर सचिनला मोबाईल नादुरुस्तीचा संदेश दिला.

नर्मदा मंदिरावरून सरळ दक्षिणतीरावर जायचा विचार होता परंतु कसा कोण जाणे, रस्ता थोडा पलीकडे धरला आणि आपोआप (नव्हे मैय्याच्या इच्छेने) मैय्या बगिच्याच्या रस्त्याला लागलो.

सरळ बगिच्यात जायचे तर नाशिकच्या कुणी परिक्रमावासीयांनी माघारी बोलावून जंगल रस्त्याने येण्यास भाग पाडले. (नाहीतर मैय्याचा गुप्त प्रवाह ओलांडला जातो हे मला ठाऊक होते.)

बागेला वळसा घालून सरळ दक्षिण तट धरला. दाट जंगलातून येताना सोनमुडा लागले. नंतर किनारा लागल्यानंतर कॉंक्रिट रस्ता संपून डावीकडे जंगलात कच्चा रस्ता शिरतो आणि पुढे हा रस्ता अमरकंटक-दिंडोरी सडकेला लागतो.

कच्चा रस्ता, डांबरी सडक, माईचा बाग, सोनमुडी सर्व सर्व भाग अतिदाट अरण्याचा आहे.

अमरकंटकपासून ७ कि.मी. वर दरीत कबीर चबुतरा आहे. पायाच्या पट्ट्या निघून गेल्यामुळे आणि बूट बाटाप्रमाणे कापडी नसल्याने, चालणे कष्टप्राय होत होते. डावी टाच फुटल्यामुळे तोही त्रास वाढला होता.

आता सडकमार्ग आहे. या हिशेबाने बूट पॅक करून सॅकला बांधले व वापरण्यासाठी चपला काढल्या.

वाटेत ठिकठिकाणी वानरांचे समूह वाटेवर बसलेले पाहिले. रानात थांबून फोटो काढण्यासाठी जेव्हा सॅक खाली उतरवे तेव्हा शबनम बॅग न विसरता गळ्यात घालीत असे. कारण माकडे गुपचूप येऊन वस्तू पळवितात.

काळतोंडी हनुमान वांदरे, मदाऱ्यांकडे असतात तशी लाल पार्श्वभागाची माकडे, आपल्या आपल्या भागाचे राजे आहेत.

वाटेत वानरांचा जथा पाहून बिस्किटे काढली तर सगळ्यांनी मला गराडा घातला आणि एक हनुमान बंदर तर माझ्यासमोर एक फुटावर उभा राहून माझ्या हातातून बिस्किटांसह पिशवी ओढायच्या तयारीत होता. अखेर एक एक बिस्किट वाटणारा मी, माकड अंगचटीला येण्यापूर्वी सर्व पुडा फोडून फेकता झालो.

अमरकंटकला छानच थंडी होती. संपूर्ण घाट रस्ता झाडांच्या सावलीतून जातो. थंडावा आहे.

घाट जवळपास उतरलो. साधारण १३ कि.मी. अंतर एकूण झाले असावे. घाटातील वळणावरील संरक्षक कठड्यावर बसलो असताना एक बस आली. त्याने दिंडोरीला आलो. बसलो तेव्हा बस रिकामी होती परंतु घाट संपून गावे सुरू झाली आणि बस तुडुंब भरली. बोंदरगाव किंवा असेच काही नावाचे गाव तिथे मेळा असल्याने ही विशेष गर्दी होती.

बस हवी तिथे हवी तशी थांबत अगदी प्रवाशांना (उतारुंना) अनुकूल अशी धावते. प्रत्येकाला तिकीट देण्याची पद्धत दिसली नाही. १०/२० रु. टेकवून प्रवास करताना दिसलेले, नेहमीचे असावेत. ही वरकमाई मालक, ड्रायव्हर व कंडक्टर अशी तिघात वाटली जाते असे कळले. मालक गप्प बसून १/३ हिस्सा घेतो. कारण तो २४ तास लक्ष ठेवू शकत नाही आणि आक्षेप घेतला तर हा भ्रष्टाचार बंद होणार नाहीच आणि मिळणारे १/३ सुद्धा मिळणार नाहीत!

(पृष्ठ क्र. २७ वर)

# अमेरिकेचे वसाहतीकरण, स्वातंत्र्य युद्ध व जॉर्ज वॉशिंग्टन

*वसाहतकालीन अमेरिका, अमेरिकन राज्यक्रांती व अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यांच्याविषयी माहिती देणारा लेख - संपादक*

सद्यस्थितीत अमेरिका (अमेरिकेची संयुक्त संस्थाने) हा देश जगातील प्रगत व सर्वच बाबतीत अग्रेसर असलेला देश म्हणून ओळखला जातो. हा देश पश्चिम गोलार्धातील उत्तर अमेरिका ह्या खंडात वसलेला असून, ह्या देशाला जगातील आजमितीला सर्वात प्रबळ व एकमेव अशी महासत्ता समजले जाते. अमेरिकेचे राज्यकर्ते अमेरिका हा 'जगाचा पोलीस' आहे असे मानतात. याचाच अर्थ असा की, ज्याप्रमाणे जागतील विविध देशांतील पोलीस वा पोलीस यंत्रणा आपापल्या देशातील कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम करत असतात; अगदी त्याचप्रमाणे अमेरिका जगातील वा जगाची कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम करत असते. यावरून अमेरिकेच्या जागतिक स्थानाची व ताकदीविषयीची कल्पना येते. ह्या घडीला तरी अमेरिका विज्ञान, तंत्रज्ञान, आर्थिक प्रगती ह्या बाबतीत अतिशय मोठ्या प्रमाणात आघाडीवर असून तिचे लष्करी बळसुद्धा अफाट आहे. अमेरिकेचे सैन्य, नौदल व हवाईदल सर्वात ताकदवान असून; क्षेपणास्त्रे, अण्वस्त्र, लढाऊ विमाने, लढाऊ युद्ध-नौका, इत्यादी अत्याधुनिक युद्धसामग्री अमेरिकेकडे आहे. ह्याच लष्कराच्या बळावर अमेरिकेने पहिल्या महायुद्धात (१९१४ ते १९१८) व दुसऱ्या महायुद्धात (१९३९-१९४५) मित्र राष्ट्रांना विजय मिळवून देण्यात सिंहाचा वाटा उचलला होता. अर्थात, अमेरिकेने दुसऱ्या महायुद्धात ७ डिसेंबर १९४१ साली सहभाग घेतला होता. दुसऱ्या महायुद्धानंतर सुद्धा अमेरिकेने पहिले आखाती युद्ध (२ ऑगस्ट १९९० ते २८ फेब्रुवारी १९९१), दुसरे आखाती युद्ध (२० मार्च २००३ ते १८ डिसेंबर २०११), अफगाणिस्तानातील तालिबान सत्तेविरुद्धचे युद्ध (७ ऑक्टोबर २००१ ते २८ डिसेंबर २०१४) ही महत्त्वाची युद्धे लढली व ह्या युद्धात करोडो डॉलर्स खर्च करून व आपली पूर्ण लष्करी ताकद पणाला लावून विजय संपादन केलेले आढळतात.

२००१ साली अल कायदा (Al qaeda) ह्या संघटनेचा तत्कालीन प्रमुख ओसामा-बिन-लादेन याच्या आदेशावरून ह्या अतिरेकी संघटनेच्या अतिरेक्यांनी अमेरिकेतील न्यू यॉर्क ह्या शहरातील 'वर्ल्ड ट्रेड सेंटर'चे दोन टोलेजंग टॉवर्स (गगनचुंबी इमारती) विमानांच्या सहाय्याने उडवून दिले व अमेरिकेच्या रागाचा उद्रेक झाला. अमेरिकेने ओसामा-बिन-लादेनच्या ह्या गुन्ह्यासाठी वा दुःसाहसासाठी त्याला मृत्यूदंड देण्याचे ठरविले. त्याप्रमाणे २००१ ते २०११ एवढी दहा वर्षे आकाश-पाताळ एक करून ओसामा-बिन-लादेनला शोधून काढले गेले व त्याला पाकिस्तानच्या अबोटाबाद ह्या शहरात ठेचले. ही कारवाई करीत असताना अमेरिकेने पाकिस्तानच्या सरकारला काडीचीही किंमत दिली नाही. त्यांना काहीही न कळवता ही कारवाई पाकिस्तानच्या भूमीत शिरून त्या देशाच्या सार्वभौमत्वाला मूठमाती देऊन व सर्व अतिरेकी संघटनांच्या नाकावर टिच्चून केली. अर्थात, असे करण्याची धमक फक्त अमेरिकेमध्येच आहे. याचे कारण वर नमूद केल्याप्रमाणे अमेरिकेची लष्करी ताकद होय.

अमेरिकेची ही सद्यस्थिती विशद करण्याचे कारण असे की, असा हा प्रबळ व जगातील सर्वात

सामर्थ्यशाली देश एकेकाळी ग्रेट ब्रिटन (इंग्लंड) ह्या देशाची वसाहत होता.

साधारणतः इसवी सनाच्या १५ व्या शतकात युरोपातील देशांनी भारताला, चीनला व इंडोनेशियाला जोडणाऱ्या जलमार्गांचे शोध लावण्याची सुरुवात केली. ह्यातूनच युरोपातील विविध देशांतील धाडसी दर्यावर्दी आपल्यासोबत अनेक खलाशी व जहाजं घेऊन अटलांटिक महासागरात जाण्याचे धाडस करू लागले. इसवी सनाच्या १५ व १६ व्या शतकांपर्यंत युरोपमधील सर्वसाधारण समज असा होता की, पृथ्वी ही गोल नसून सपाट आहे. मात्र, प्रबोधनाची चळवळ सुरू झाल्यावर शास्त्रज्ञांनी, वैज्ञानिकांनी व खगोलशास्त्रज्ञांनी सिद्ध केले की, पृथ्वी सपाट नसून गोल आहे. त्यामुळे हे दर्यावर्दी अटलांटिक महासागरातून पश्चिमेकडे आपल्या जहाजांचा व गलबतांचा ताफा घेऊन जाऊ लागले. याचे कारण, त्यांना विश्वास होता की, पृथ्वी गोल असल्यामुळे ते अटलांटिक महासागरातून पश्चिमेकडे जात राहिले तर ते पृथ्वीला जलमार्गाने प्रदक्षिणा घालून आपोआप पूर्वेकडील राष्ट्रांमध्ये जाऊन पोहोचतील.

युरोपमधल्या लोकांना व प्रामुख्याने राजांना ह्या जलमार्गांचा शोध लावण्यास भाग पाडणारी अजून एक घटना म्हणजे १४५३ साली कॉन्सटेंटिनोपल (Constantinople) ह्या शहराचा ऑटोमन तुर्कांनी केलेला पाडाव हे होय. कॉन्सटेंटिनोपल हे शहर पूर्वेकडील रोमन (ग्रीक) साम्राज्याची राजधानी होती. ह्या ग्रीक साम्राज्याला बायझेनटाईन एम्पायर (Byzantine Empire) असे संबोधले जाई. ह्या शहरावर तुर्कांनी हल्ला केल्यावर येथील ग्रीक वंशाचे बरेच लोक त्यांच्याजवळ असणारे प्राचीन काळात लिहिले गेलेले दुर्मिळ ग्रीक व लॅटिन ग्रंथ घेऊन इटलीच्या दिशेने पळाले. याचे कारण तुर्क धर्माने मुस्लीम होते तर ग्रीक ख्रिस्ती होते. त्यामुळे आक्रमणकर्त्या खुंखार तुर्कांनी आपल्या पूर्वजांचा हा दुर्मिळ दस्तावेज नष्ट करू नये म्हणून ते तेथून पळून गेले. पुढे हेच ग्रंथ वाचून सुरुवातीला इटलीमध्ये व कालांतराने युरोपमधील इतर अनेक देशांमध्ये प्रबोधनाची चळवळ सुरू केली व ह्या चळवळीमुळे युरोपचा पूर्णपणे कायापालट झाला. तसेच युरोपचे आधुनिकीकरण होण्यास सुरुवात झाली. नवीन साहित्य निर्माण झाले. चित्रकला, मूर्तीकला, शिल्पकला, विज्ञान-तंत्रज्ञान इत्यादी क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रगती होऊ लागली. असो. प्रबोधन हा एका विशेष लेखाचा विषय होऊ शकतो.

कॉन्सटेंटिनोपल हे शहर युरोप खंड व आशिया खंडाला जोडणारा एक प्रकारचा पूल होता. ह्या शहरातून पश्चिमेकडे गेल्यावर व्यापाऱ्यांचा युरोपमध्ये प्रवेश होत असे; तर ह्या शहरातून पूर्वेकडे आल्यावर ते आशियामध्ये येत असत. तुर्कांनी हे शहर काबीज करून त्याचे नामांतर इस्तंबूल असे केले. त्याचप्रमाणे त्यांनी युरोपीयन व्यापाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात 'टोल' नामक कर वसूल करण्यास सुरुवात केली. त्यामुळे युरोपीयन व्यापारी, तुर्कांच्या इस्तंबूल ह्या शहरातून खुष्कीच्या (जमीन) मार्गाने आशियात जाण्यासाठी कचरू लागले. ह्या घटनेमुळेसुद्धा युरोपीयन लोकांना पूर्वेकडील जगाला जोडणारे जलमार्ग शोधणे क्रमप्राप्त ठरले.

यातूनच युरोपमधील विविध राजघराण्यांनी सागरी मोहिमा पुरस्कृत करण्यास सुरुवात केली. ह्यात सुरुवातीच्या काळात तरी स्पेन व पोर्तुगालसारखे देश आघाडीवर होते. त्यानंतर इंग्लंडसारखा देशदेखील ह्या स्पर्धेत उतरला व समुद्र मार्गांबरोबर नवनवीन भूप्रदेशांचा शोध लागण्याची सुरुवात झाली.

अमेरिका खंडाचा विचार केला असता असे म्हणतात की, हजारो वर्षांपूर्वी ईशान्य आशियातून बेरींग स्ट्रेट (Bering Strait) ओलांडून वा पार करून अलास्कामार्गे उत्तर अमेरिकेत काही लोक गेले व

आत्मसमर्थनाने सद्गुणाची किंमत नष्ट होते. - वोल्टेर

त्यानंतर हे लोक दक्षिण अमेरिकेपर्यंत जाऊन पोहोचले. हेच लोक नंतरच्या काळात रेड इंडियन म्हणून ओळखले गेले. जेव्हा युरोपीयन लोक उत्तर व दक्षिण अमेरिकेत गेले तेव्हा त्यांचा ह्याच रेड इंडियन लोकांसोबत प्रदीर्घकाळ तंटा चालला. मध्य व दक्षिण अमेरिकेत तर स्पॅनिश लोकांनी रेड इंडियन लोकांच्या इंका (Inca), मायन (Mayan) व ॲझटेक (Aztec) ह्या जुन्या सभ्यता व संस्कृती नष्ट करण्याचे महापातक केले. असो. ह्या रेड इंडियन लोकांनंतर इसवी सनाच्या १००० ह्या वर्षाच्या आसपास लिफ एरिकसन (Leif Ericson) ही पहिली युरोपीयन व्यक्ती उत्तर अटलांटिक महासागरात लॅब्रॉडॉर (Labrador) च्या किनाऱ्यापर्यंत जाऊन पोहोचली. हा एरिकसन म्हणजे नवीन जगाच्या (उत्तर अमेरिकेच्या) किनाऱ्यापर्यंत जाणारी पहिली युरोपीयन व्यक्ती होय असे मानले जाते. मात्र, एरिकसनचे हे धाडस लवकरच युरोपीयन लोकांच्या विस्मृतीत गेले.

ख्रिस्तोफर कोलंबस ह्याने खऱ्या अर्थाने नवीन जग (अमेरिका खंड) शोधून काढले असे सर्वसाधारणपणे मानले जाते. कोलंबस हा मूळचा इटलीचा. ह्याला चीन, जपान, इंडोनेशियाची बेटे इकडे जाणारा जलमार्ग शोधून काढण्याची इच्छा व महत्त्वाकांक्षा होती. अर्थात, ह्या युरोपीयन दर्यावर्द्यांचे प्रेरणास्थान मार्को पोलो (Marco Polo) हा इटलितील १३ व्या शतकातील प्रवासी होता. मार्को पोलोने जगातील विविध प्रदेशांची व देशांची भ्रमंती केली होती. तो काही काळ चीनमधील कुबलाई खान (Kublai Khan) ह्या राजाच्या दरबारातसुद्धा राहिलेला होता. कोलंबसला मार्को पोलोने लिहिलेले प्रवासवर्णन व त्याच्या आठवणी वाचून जगातील ह्या पूर्वेकडील भागांना युरोपशी जोडणारा जलमार्ग शोधून काढण्याची प्रेरणा मिळाली असे म्हटले जाते. कोलंबसला त्याची धाडसी सागरी मोहीम पार पाडण्यासाठी स्पेनच्या इसाबेला (Isabella) ह्या राणीने मोठी मदत केली होती. कोलंबसने आपल्यासोबत तीन गलबते घेऊन अटलांटिक महासागरात पश्चिमेच्या दिशेने जवळ जवळ ३००० मैलांहून अधिक अंतर तेहतीस दिवस प्रवास करून कापले व तेव्हा त्याच्या दृष्टीपथास एक जमिनीचा भाग पडला. हा भाग म्हणजे कॅरिबियन समुद्रातील (Caribbean Sea) गुआनहानी (Guanhani) ह्या वेस्ट इंडिजच्या बेटाचा होता. ह्याच बेटाला कोलंबसने सॅन सॅलव्हाडोर (San Salvador) असे नाव दिले. असे म्हणतात की, कोलंबस वेस्ट इंडिज व क्युबा ह्या बेटांच्या पुढे जाऊ शकला नाही. परंतु त्याच्या धाडसामुळे युरोपमधल्या विविध देशांतील युरोपीयन लोक ह्या नवीन जगाकडे जाऊ लागले. अशाच एका दर्यावर्द्यांपैकी अमेरिगो वेसपुसी (Amerigo Vespucci) हा होता. हा सुद्धा मूळचा इटालियन म्हणजे युरोपमधील इटली ह्या देशाचा होता. अमेरिगो वेसपुसी १४९९ मध्ये दक्षिण अमेरिकेच्या उत्तर किनाऱ्यापर्यंत जाऊन पोहोचला होता. नंतरच्या काळात मार्टीन वाल्डसीमुल्लर (Martin Waldseemuller) ह्या जर्मन भूगोलतज्ज्ञाने नव्या जगाला अमेरिगो वेसपुसीच्या सन्मानार्थ अमेरिका हे नाव द्यावे असे सुचविले. कारण त्याच्या मते अमेरिगो वेसपुसीने नव्या जगाला भेट दिल्यानंतर त्या भूभागाविषयीची बरीचशी माहिती लिहून ती युरोपीयन लोकांपर्यंत पोहोचविण्याचे मोठे कार्य केले होते. अर्थात, मार्टीन वाल्डसीमुल्लरची ही सूचना जनमानसात मान्य होऊन नव्या जगाला 'अमेरिका' हे नाव प्राप्त झाले. कालांतराने युरोपमधील वेगवेगळ्या देशांतील लोकांची नव्या जगाकडे जाण्याची रीघ लागली व असे लक्षात आले की, नवे जग हे फार मोठे असून खरे पाहता हे मध्यभागी चिंचोळ्या पट्ट्याने जोडले गेलेले दोन महाकाय खंड आहेत. त्यामुळेच पुढे चालून उत्तरेकडील भागाला उत्तर अमेरिका खंड तर दक्षिणेकडील भागाला दक्षिण अमेरिका खंड असे संबोधले गेले. उत्तर अमेरिकेमध्ये प्रामुख्याने ब्रिटिश व फ्रेंच लोकांनी स्थलांतर केले तर मध्य व दक्षिण अमेरिकेत पोर्तुगीज व स्पॅनिश

---

साधेपणाच्या कोंदणात माणसाचा सद्गुण खुलून दिसतो. - एफ. बेकॉन

लोकांनी स्थलांतर केले. त्यामुळेच कॅनडा व अमेरिकेची संयुक्त संस्थाने (अमेरिका) ह्या देशांत इंग्रजी भाषा व संस्कृतीचे वर्चस्व आजही जाणवते. मध्य व दक्षिण अमेरिकेतील मेक्सिको (अमेरिकेचे दक्षिणेकडील शेजारी राष्ट्र), एल सॅलव्हाडोर, होंडुरास, निकारगुआ, पनामा, कोलंबिया, पेरू, बोलिविया, उराग्वे, पराग्वे, वेनेझुएला, अर्जेंटिना, चिली इत्यादी देशांमध्ये स्पॅनिश भाषा व संस्कृतीचे प्राबल्य जाणवते. दक्षिण अमेरिकेतील ब्राझील हा सर्वात मोठा देश मात्र पोर्तुगीजांच्या ताब्यात होता. त्यामुळे ह्या देशावर पोर्तुगीज भाषा व संस्कृतीचा पगडा जाणवतो.

इंग्लंडच्या पहिल्या एलिझाबेथ-१५३३-१६०३ (Elizabeth -1533-1603) राणीनेसुद्धा सागरी मोहिमांना व वसाहतीकरणाला मोठ्या प्रमाणात पाठिंबा दिलेला आढळतो. १६ व्या शतकाच्या शेवटी शेवटी इंग्लंडमध्ये द मस्कोव्ही कंपनी (The Muscovy Company), द लेव्हंट कंपनी (The Levant Company), द ईस्ट इंडिया कंपनी (The East India company) अशा अनेक व्यापारी कंपन्यांची स्थापना व्हायला सुरुवात झाली व ह्या कंपन्यांनीसुद्धा सागरी मोहिमा, भौगोलिक शोध व वसाहतीकरणासाठी पैसा पुरवल्याचे आपल्या निदर्शनास येते. अर्थात, ह्या कंपन्यांना पूर्वेकडील व इतर नवनवीन प्रदेशांत जाऊन आपल्या कंपनीच्या व्यापाराला चालना द्यावयाची होती. इंग्लंडच्या पहिल्या एलिझाबेथ राणीने कॅप्टन फ्रान्सिस ड्रेक (Captain Francis Drake) ह्या इंग्रज दर्यावर्द्याला त्याच्या सागरी साहसामध्ये पूर्ण मदत केली होती. एवढेच नव्हे तर, तिने त्याला स्पॅनिश दर्यावर्द्यांना धडा शिकविण्याचे देखील सांगितले होते. ह्या पठ्ठ्याने आपल्या राणीचा आदेश म्हणजे पडत्या फळाची आज्ञा मानून स्पॅनिश गलबतांना व जहाजांना त्रास देण्यास सुरुवात केली. ह्याने दक्षिण अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यालगत सुद्धा अपली दहशत निर्माण केली व येथे स्पॅनिश लोकांचे 'कॅकाफ्युगो' (Cacafuego) नामक जहाज लुटले. यात पेरू या देशात लुटलेली चांदी लादलेली होती. ही लुटलेली सर्व चांदी इंग्लंडच्या राणीच्या तिजोरीत गेली. फ्रान्सिक ड्रेकने कॅलिफोर्नियाच्या किनाऱ्याचे अवलोकन करून हा किनारपट्टीचा भाग इंग्लंडचा असल्याची भूमिका घेतली. ह्याने पॅसिफिक (प्रशांत) महासागर ओलांडून जलमार्गाने पृथ्वीला प्रदक्षिणा घातली व १५८० मध्ये स्वगृही म्हणजेच इंग्लंडला परतला. ही कामगिरी पूर्ण करून ट्रेक जेव्हा इंग्लंडला परतला तेव्हा त्याचे जंगी स्वागत करण्यात आले.

नवीन जगात (अमेरिका) इंग्रज लोकांनी वसाहती करून राहण्यासाठी तिकडे जाण्याचा पहिला प्रयत्न सर हम्प्रे गिलबर्ट (Sir Humphrey Gilbert) ह्याने केला असे मानले जाते. ह्याचे शिक्षण इंग्लंडमधील जगप्रसिद्ध अशा ऑक्सफोर्ड विद्यापीठातून झाले होते. ह्याने १५७८-७९ मध्ये अमेरिकेत जाण्याचा पहिला प्रयत्न केला. १५८३ मध्ये गिलबर्ट पुन्हा एकदा आपल्या सोबत पाच जहाज व सुमारे २०० लोक घेऊन अमेरिकेकडे गेला. हे २०० लोक अमेरिकेत कायमस्वरूपी वस्ती करणार होते. ह्यावेळी गिलबर्ट सध्याच्या कॅनडाच्या अतिपूर्वेकडील न्यू फाऊंडलॅंड (New foundland) ह्या प्रदेशात येऊन पोहोचला. त्याने अजून दक्षिणेकडे जाऊन वसाहत स्थापण्याचा मनोदय केला होता. मात्र त्याची ही इच्छा पूर्ण होऊ शकली नाही. तो इंग्लंडला परत येत असताना अटलांटिक समुद्रातील अॅझोरस (Azores) ह्या द्वीप समुहानजीक समुद्री वादळात त्याचे जहाज बुडाले. गिलबर्टनंतर त्याचा भाऊ सर वॉल्टर रॅले (Sir Walter Raleigh) ह्याने अमेरिकेत वसाहती स्थापन करण्याच्या मोहिमेची जबाबदारी स्वीकारली. हा अतिशय देखणा व महत्त्वाकांक्षी व्यक्ती होता व तो एलिझाबेथ राणीच्या खूप जवळची व्यक्ती म्हणून ओळखला जात असे. ह्याने उत्तर अमेरिकेचा पूर्व किनारा धुंडाळून काढून अधिक माहिती गोळा करण्याकरिता अनेक सागरी मोहिमा

आखल्या. ह्या प्रदेशाला त्याने व्हर्जिनिया (Virginia) असे नाव ठेवले होते. ह्या नावामागे एक गंमतशीर गोष्ट आहे व ती म्हणजे इंग्लंडची राणी एलिझाबेथ ही कुमारी (लग्न न झालेली) असल्यामुळे त्याने आपल्या ह्या लग्न न झालेल्या राणीच्या सन्मानार्थ ह्या प्रदेशाला व्हर्जिनिया असे संबोधण्याचे ठरविले. कारण लग्न न झालेल्या स्त्रियांना इंग्रजीमध्ये व्हर्जिन गर्ल्स (Virgin Girls) असे म्हटले जाते.

सर वॉल्टर रॅलेप्रमाणेच रिचर्ड हॅकल्यूट (Richard Hakluyt) ह्या इंग्रज व्यक्तीनेसुद्धा इंगलंडला आपले लोक अमेरिकेत पाठवून वसाहती निर्माण केल्यास कसा फायदा होऊ शकतो हे आपल्या 'डिसकोर्स ऑन वेस्टर्न प्लान्टिंग' (Discourse on Western Planting) ह्या निबंधाद्वारे दाखवून देण्याचा प्रयत्न केला. मात्र, राणी एलिझाबेथ हिने ह्या सुचनेवर पूर्णतः कार्यवाही करण्याचे धाडस दाखविले नाही. शेवटी तिच्या मृत्यूनंतर १६०३ पासून व्यापाऱ्यांनी व भांडवलदारांनी उत्तर अमेरिकेत ब्रिटिश वसाहती स्थापन करण्याचे मनावर घेतले. यावरून असे लक्षात येते की, निदान सुरुवातीच्या काळात तरी इंग्लंडचे राज्यकर्ते उत्तर अमेरिकेचे वसाहतीकरण करण्यास जास्त उत्सुक नव्हते.

१६०५ मध्ये काही इंग्रज व्यापाऱ्यांनी केलेल्या विनंतीनुसार 'द लंडन कंपनी' (The London company) 'द प्लायमाऊथ-ब्रिस्टल कंपनी' (The Plymouth and Bristol Company) ह्या दोन व्यापारी कंपन्यांना अनुक्रमे दक्षिण व्हर्जिनिया व उत्तर व्हर्जिनियामध्ये जाऊन वसाहतीकरणाच्या संधी चाचपडून पाहण्याची अनुमती इंग्लंडचा तत्कालीन राजा पहिला जेम्स (James I ) याने दिली. अशा तऱ्हेने १७ व्या शतकाच्या सुरुवातीलाच बिटिश लोकांना उत्तर अमेरिकेत (व्हर्जिनियात) जाऊन कायमस्वरूपी वसाहत करून राहण्याची कवाडे खऱ्या अर्थाने मोकळी झाली असे म्हणणे वावगे ठरू नये. १६०७ च्या मे महिन्यात इंग्लंडमधील लोकांचा एक गट उत्तर अमेरिकेच्या तटावर चेसापिक बे (Chesapeake Bay) च्या आसपास येऊन पोहोचला व त्यांनी इंग्रज लोकांच्या नवीन जगातील (अमेरिका) जेम्स टाऊन (Jamestown) ह्या पहिल्या वसाहतीची स्थापना केली. ह्यानंतर १७ व्या शतकात इंग्लंडमधील लोकांचा अमेरिकेत जाण्याचा ओघ सुरुच होता व इंग्लंडच्या विविध भागांतील लोक अमेरिकेला येऊ लागले. यातील अनेक लोकांना ह्या नवीन जगात आपले नशीब अजमावयाचे होते व जमल्यास खूप माया कमवून सुखी, समाधानी व समृद्ध जीवन जगायचे होते. तर काही लोकांना इंग्लंडमधील तत्कालीन धार्मिक असहिष्णुतेचा कंटाळा आला होता. त्यामुळे प्युरिटन (Puritan), क्वेकर (Quakar) अशा विविध पंथांचे लोक अमेरिकेकडे येऊ लागले. आपण पाहिलेत की, १६०७ मध्ये ब्रिटिश लोकांनी जेम्स टाऊनमध्ये आपली पहिली वसाहत स्थापन केली. त्यानंतर मोठ्या प्रमाणात इंग्लंडमधून बरेच लोक अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावर येऊ लागले व या ब्रिटिश लोकांनी १३ वसाहती स्थापन केल्या. ह्या वसाहतींची नावे पुढील प्रमाणे आहेत - मॅसॅच्यूसेटस् (Massachusetts), कनेक्टीकट (Connecticut), न्यू हॅम्पशायर (New Hampshire), ऱ्होड आयलंड (Rhode Island), न्यू यॉर्क (New York), न्यू जर्सी (New Jersey), पेनझिलव्हॅनिया (Pennsylvania), मेरीलँड (Maryland), डेलवेर (Delware), व्हर्जिनिया (Virginia), नॉर्थ कॅरोलिना (North Carolina), साऊथ कॅरोलिना (South Carilona) व जॉर्जिया (Georgia). ह्या विविध वसाहतीं मधील राहाणारे लोक ख्रिस्ती धर्माच्या क्वेकर (Quakar), इव्हॅनजेलिकल (Evangelical), प्रोटेसटंट (Protestant), कॅथलिक (Catholic) इत्यादी पंथांचे होते.

पेनझिलव्हॅनिया ह्या वसाहतीची स्थापना विल्यम पेन ह्यांनी केली होती. ते स्वतः क्वेकर ह्या पंथाचे होते.

जो विजयानंतरही स्वतःवर संयम ठेवू शकतो, त्याला दुप्पट विजय लाभतो. - बी. एफ. बेकॉन

त्यांनी पेनझिलव्हॅनिया वसाहतीमध्ये लोकांनी त्यांच्या मर्जीप्रमाणे धर्मोपासना करावी असे जाहीर केले होते. मेरिलँड या वसाहतीची स्थापना लॉर्ड बॅल्टीमोअर यांनी कॅथलिक पंथीय लोकांसाठी केली होती. मात्र, त्यांनी तेथे प्रोटेसटंट लोकांनासुद्धा स्थायिक होण्याची अनुमती दिली होती. डच (Dutch) लोकांनी न्यू ॲमस्टरडम येथे आपले व्यापारी केंद्र उभारले होते. ब्रिटिशांनी १६६४ मध्ये डचांचा पराभव करून न्यू ॲस्टरडम जिंकून घेतले व त्याचे नाव बदलून न्यू यॉर्क असे ठेवले. न्यू यॉर्क या वसाहतीचा काही भाग वेगळा काढून न्यू जर्सी ही वसाहत स्थापन झाली. डेलवर वसाहतीची स्थापना मुळात स्विडीश कंपनीने केली होती. मात्र ही वसाहत कालांतराने ब्रिटिशांच्या नियंत्रणाखाली गेली. अशा तऱ्हेने अमेरिकेच्या १३ वसाहती स्थापन होण्याचा इतिहास फार रोचक आहे.

१८ व्या शतकापर्यंत या १३ वसाहतींमध्ये इंग्रज वंशाच्या लोकांची संख्या सर्वात जास्त होती. त्यामुळे ह्या १३ वसाहतींचे पालकत्व एका अर्थाने इंग्लंडकडे होते. इंग्लंडचे सरकार व राजा ह्या वसाहती इंग्लंडच्या जागतिक साम्राज्याचा भाग आहेत असे समजत. सुरवातीच्या काळात म्हणजेच १७ वे शतक तसेच १८ व्या शतकाच्या मध्यापर्यंत या वसाहतींची सुद्धा बांधिलकी व एकनिष्ठता इंग्लंडसोबतच होती. १३ वसाहतीतील लोक इंग्लंडला मातृभूमी (Mother Country) मानत असत. ह्या बहुतेक १३ वसाहतींमध्ये एक विशिष्ट प्रकारची प्रशासकीय व्यवस्था होती. या व्यवस्थेनुसार वसाहतींचे प्रश्न पाहाण्यासाठी एक राज्यपाल असे. ह्या राज्यापालाची नेमणूक इंग्लंडचा राजा करत असे व हा राज्यपाल अनेक वेळा इंग्रज व्यक्तीच असे. तसेच ह्या वसाहतींमध्ये वसाहतीमधील लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींची असेंब्ली असे. ही असेंब्ली वसाहतींसाठी स्थानिक कायदे करत असत. मात्र, वसाहतींबाबत अतिमहत्त्वाचे कायदे बनवण्याचा अधिकार इंग्लंडच्या संसदेला होता. कालांतराने इंग्लंडच्या संसदेने १३ वसाहतींचे आर्थिक शोषण करण्यास सुरुवात केली. वसाहतींचे आर्थिक शोषण करण्यासाठी इंग्लंडच्या संसदेने विविध कायदे पारित केले होते. यातील काही कायदे पुढील प्रमाणे आहेत - नेवीगेशन लॉज् (Navigation Laws), शुगर ॲक्ट (Sugar Act), स्टॅम्प ॲक्ट (Stamp Act), कॉर्टरिंग ॲक्ट (Quartering Act), टाउनशेंड ॲक्ट (Townshend Act), इत्यादी.

अमेरिकेच्या १३ वसाहतींनी ह्या विविध जाचक कायद्यांना विरोध केला. १३ वसाहतीतील लोकांनी किंवा अमेरिकन लोकांनी ह्या कायद्यांचा विरोध करावा असे मत जॉर्ज वॉशिंग्टन यांनी सुद्धा व्यक्त केले होते. नंतरच्या काळात जॉर्ज वॉशिंग्टन स्वतंत्र अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष बनले. त्याचप्रमाणे जॉर्ज वॉशिंग्टन यांचे असे मत होते की, १३ वसाहतींची ब्रिटिशांच्या छळापासून मुक्तता करण्यासाठी अमेरिकन लोकांनी शस्त्र हातात घेतले पाहिजे. ब्रिटिश संसदेने १७७३ साली जेव्हा 'टी ॲक्ट' (Tea Act) पास केला तेव्हा अमेरिकन लोकांच्या रागाचा उद्रेग झाला. ह्या कायद्याने ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीला खूप स्वस्त दरात अमेरिकेत चहा विकण्याची मुभा दिली होती. मात्र, आता अमेरिकन लोकांना ब्रिटिश संसदेने पास केलेला कुठलाही कायदा नको होता. त्यामुळे १६ डिसेंबर १७७३ या दिवशीच्या संध्याकाळी रेड इंडियन लोकांसारखी वेशभूषा करून जवळ-जवळ १०० अमेरिकन लोक ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या बोस्टन बंदरात नांगर टाकून असलेल्या जहाजावर चढले व त्यांनी ईस्ट इंडिया कंपनीचा त्या जहाजावरील चहा समुद्रामध्ये फेकून देऊन नष्ट केला. ह्या घटनेला अमेरिकेच्या इतिहासात 'बोस्टन टी पार्टी' म्हणून संबोधले जाते. ह्या घटने नंतर इंग्लंडचे सरकार बिथरले व इंग्लंडच्या संसदेने बोस्टन व मॅसॅचुसेट्सच्या लोकांना या कृत्यासाठी शिक्षा देण्यासाठी 'इनटॉलरेबल ॲक्टस्'(Intolerable Acts) पास केले. ह्या कायद्यांनुसार

हरलेल्या युद्धाइतकी विषण्ण करणारी दुसरी गोष्ट म्हणजे जिंकलेली लढाई. - ड्युक ऑफ वेलिंग्टन

बोस्टनचे लोक ईस्ट इंडिया कंपनीच्या नष्ट केलेल्या चहाची जोपर्यंत नुकसान भरपाई करून देत नाहीत तोपर्यंत बोस्टन हे बंदर बंद राहील असे जाहीर करण्यात आले. तसेच मॅसॅचुसेटस्च्या संसदेवर अनेक निर्बंध घालण्यात आले व या वसाहतीचा कारभार इंग्लंडच्या सरकारच्या थेट नियंत्रणाखाली आणण्यात आला. मॅसॅचुसेटस्मधील ब्रिटिश सैन्याची राहण्याची व खाण्यापिण्याची सोय व इतर व्यवस्था त्या वसाहतीत राहणाऱ्या लोकांनी स्वखर्चाने करावी असे देखील सांगण्यात आले.

मॅसॅचुसेटस् (Massachusetts) वसाहत व बोस्टन बंदराबाबत इंग्लडच्या सरकारने घेतलेल्या ह्या निर्णयामुळे इतर वसाहतींतील लोक व राजकीय पुढारी फारच रागावले. यात जॉर्ज वॉशिंग्टन यांचा देखील समावेश होता. अशा वेळी मॅसॅचुसेटस् वसाहतीला पाठिंबा देणे व इंग्लंडच्या सरकारला ह्याचा जाब विचारणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे असे मानून जॉर्जिया ही वसाहत वगळता इतर बारा वसाहतींच्या प्रतिनिधींची एक परिषद फिलाडेलफिया (Philadelphia) ह्या शहरात ५ सप्टेंबर १७७४ रोजी भरवण्यात आली होती. ह्या परिषदेला 'फर्स्ट कॉन्टीनेटल काँग्रेस' (First Continental Congress) असे संबोधले गेले. ह्या परिषदेला व्हर्जिनियाचे एक प्रतिनिधी म्हणून जॉर्ज वॉशिंग्टन सुद्धा गेले होते. या परिषदेत अमेरिकेच्या १३ वसाहतींना स्वातंत्र्य मिळावे असे म्हटले नव्हते. मात्र, इंग्लंडने मॅसॅचुसेटस् विरूद्ध केलेली कारवाई व इतर जाचक निर्णय मागे घ्यावेत अशी मागणी करण्यात आली. याच परिषदेत अमेरिकन लोकांच्या हक्कांचा जाहीरनामा (Declaration of Rights) प्रसिद्ध करण्यात आला.

इंग्लंडने ह्या परिषदेने केलेल्या मागण्या पूर्ण केल्या नाहीत तर मे १७७५ मध्ये अशाच प्रकारची दुसरी परिषद भरविण्यात येईल असे ठरविण्यात आले. मात्र १९ एप्रिल १७७५ रोजी काँकर्ड (Concord) व लेक्झींग्टन (Lexington) या दोन ठिकाणी बिटिश सैन्य व अमेरिकन लोकांमध्ये चकमकी झाल्या व अमेरिकेच्या स्वातंत्र्य युद्धाची वा अमेरिकन क्रांतीची सुरुवात झाली. ह्या पार्श्वभूमीवर १० मे १७७५ रोजी सेकंड (दुसऱ्या) कॉन्टिनेंटल काँग्रेसची सुरुवात झाली. असे म्हणतात की, ह्या परिषदेला जॉर्ज वॉशिंग्टन हे आपल्या सैनिकी पोशाखात गेले होते. यातून जॉर्ज वॉशिंग्टनना निःसंदेहपणे असा संदेश द्यावयाचा होता की, आता मागे वळून पाहाणे नाही व इंग्लंडला जशाच तसे उत्तर देऊन व युद्ध करून अमेरिकन वसाहतींना इंग्रजांच्या जुलमी राजवटीतून मुक्त वा स्वतंत्र करणे आवश्यक आहे. या परिषदेतील दोन महत्त्वाच्या घटना म्हणजे १५ जून १७७५ रोजी जॉर्ज वॉशिंग्टन यांना अमेरिकन सैन्याचा सरसेनापती म्हणून नियुक्त करण्यात आले व त्यांना ब्रिटिशांविरूद्ध लढण्यासाठी सरसेनापती या नात्याने युद्धविषयक सर्व निर्णय घेण्याचे अधिकार देण्यात आले. अमेरिकेच्या सैन्याला 'कॉन्टिनेंटल आर्मी' असे संबोधण्यात आले. या परिषदेतील दुसरी घटना म्हणजे थॉमस जेफरसन (Thomas Jefferson), बेंजामिन फ्रँकलीन (Benjamin Franklin) आदी नेत्यांनी बनवलेला 'अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा' (Decleration of Independence) ही होय. सदर जाहीरनामा या परिषदेने ४ जुलै १७७६ रोजी स्वीकारला गेला. म्हणूनच हे राष्ट्र आजही हा दिवस आपला स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा करते.

ह्या युद्धामध्ये जॉर्ज वॉशिंग्टन ह्यांनी अनेकदा बिकट परिस्थितीमध्ये अमेरिकन सैन्याचे ब्रिटिशांविरूद्ध नेतृत्व केले. अमेरिकन सैन्याला अनेक वेळा खाण्यापिण्याच्या वस्तुंचा तुटवडा असे. तसेच शस्त्रास्त्रे, बूट, इ. आवश्यक युद्ध सामग्रीसुद्धा वेळेवर मिळत नसे. बरेच अमेरिकन सैनिक या युद्धादरम्यान रोगराईंनासुद्धा बळी पडले होते. याउलट ब्रिटिश सैन्याला रसद व इतर वस्तू वेळेवर मिळत असत. त्याचप्रमाणे इंग्लंडच्या नौदलाच्या सबळ पाठिंब्यामुळे सुरुवातीच्या काळाततरी अमेरिकन सैन्याला

बऱ्याच वेळा विजयामुळे विजेत्यांचे नुकसान झालेले आहे! - प्लेटो

ब्रिटिशांकडून हार पत्करावी लागली. मात्र अमेरिकेच्या सैन्याकडे ब्रिटिशांवर मात करणारा एक हुकुमी एक्का होता व तो म्हणजे खुद्द जॉर्ज वॉशिंग्टन होत. जॉर्ज वॉशिंग्टन हे स्वतः एक लढवय्ये सैनिक होते. त्याचप्रमाणे आपल्या सैनिकांना रणांगणावर प्रेरित करणारे व शत्रूला कोंडीत पकडणारी व्युहरचना करणारे धुरंदर सेनापती होते. जॉर्ज वॉशिंग्टन यांनी बिकट परिस्थितीतून व बाक्या प्रसंगातून आपल्या सैनिकांना बाहेर तर काढलेच मात्र इंग्रजांसारख्या बलाढ्य शत्रूला पराभूत करून अमेरिकेसाठी विजयश्री खेचून आणली. त्यामुळे जॉर्ज वॉशिंग्टन यांची गणना जगाच्या इतिहासामधील महान सेनापतींमध्ये केली जाते. १७८१ पर्यंत स्पष्ट झाले की, अमेरिकन स्वातंत्र्य युद्धाचे पारडे अमेरिकेच्या बाजूने झुकले आहे. त्यातच १९ ऑक्टोबर १७८१ रोजी यार्क टाऊन येथे अमेरिकन सैन्याने लॉर्ड कॉर्नवॉलिस (Lord Cornwallis) या ब्रिटिश सेनापतीला हरवले व कॉर्नवॉलिसने अमेरिकन सैन्यापुढे शरणागती पत्करली. हा अमेरिकन लोकांनी ब्रिटिश सैन्याला दिलेला मोठा झटका होता. अमेरिकेचे हे स्वातंत्र्ययुद्ध अमेरिकेच्या काही भागात अजून दोन वर्ष चालू होते. एप्रिल १७८२ मध्ये अमेरिकनचे प्रतिनिधी व ब्रिटिश प्रतिनिधींमध्ये फ्रान्सची राजधानी पॅरीस येथे एक बैठक झाली. या बैठकीचे फलीत म्हणजे अमेरिकेच्या १३ वसाहती व इंग्लंडच्या दरम्यान ३ सप्टेंबर १७८३ रोजी एक तह झाला. या तहास पॅरीसचा तह म्हटले गेले. या तहानुसार इंग्लंडने अमेरिकेचे स्वातंत्र्य मान्य केले व अमेरिकेच्या १३ वसाहतींना एक स्वतंत्र देश म्हणून मान्यता दिली.

येथे एक महत्त्वाची बाब म्हणजे, अमेरिकेला त्यांच्या ब्रिटिशांविरुद्धच्या लढ्यात फ्रान्स या देशाने मोठ्या प्रमाणात मदत केली होती. अमेरिकेला फ्रान्सच्या राजाने मोठ्या प्रमाणात सैन्य व पैसा पुरवला होता. यामागचे कारण म्हणजे युरोपच्या राजकारणात इंग्लंड व फ्रान्स नेहमीच एकमेकांचे स्पर्धक राहिले आहेत. किंबहुना आजही आहेत.

त्या काळात उत्तर अमेरिकेतील कॅनडा या देशावरून इंग्लंड व फ्रान्समध्ये वाद होता. इंग्लंडने फ्रान्सला युद्धात हरवून हा प्रांत काबीज केला होता. याचा वचपा फ्रान्सने अमेरिकन लोकांना इंग्लंडविरूद्ध मदत करून काढला. अमेरिका स्वतंत्र झाल्यानंतर अमेरिका व फ्रान्सच्या मैत्रीचे प्रतीक म्हणून फ्रान्सने स्वातंत्र्य देवतेचा पुतळा (Statue of Liberty) अमेरिकेला भेट म्हणून दिला. हा स्वातंत्र्य देवतेचा पुतळा न्यू यॉर्कच्या बंदरामध्ये अजूनही आहे व ते जगभरातील पर्यटकांचे मोठे आकर्षण आहे.

वरील विवेचनावरून असे लक्षात येते की, १० मे १७७५ रोजी अमेरिकेच्या वसाहतींनी इंग्लंडच्या जुलुमी राजवटीविरुद्ध खऱ्या अर्थाने बंड केले व अमेरिकन स्वातंत्र्य युद्धाला सुरुवात झाली. हे स्वातंत्र्य युद्ध १७७५ ते १७८३ पर्यंत चालले व शेवटी १७८३ च्या पॅरीसच्या तहानुसार अमेरिकेला खऱ्या अर्थाने इंग्लंडच्या राजवटीतून स्वातंत्र्य मिळाले. अमेरिकन स्वातंत्र्य युद्धादरम्यान वा अमेरिकन क्रांती दरम्यान ब्रिटिश सैन्याविरुद्ध झालेल्या लढायांमध्ये अमेरिकेच्या सैन्याचे नेतृत्व जॉर्ज वॉशिंग्टन यानी केले होते. जॉर्ज वॉशिंग्टन यांचे अमेरिकेच्या इतिहासात व एकंदरीतच तेथील सामाजिक व लोकजीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. आजही अमेरिकन समाजात जॉर्ज वॉशिंग्टन यांच्याविषयी नितांत आदर आहे. जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या जीवनातील विविध घटना व गोष्टी आजही अमेरिकेतील लहान मुलांना घराघरांतून सांगितल्या जातात. ह्या मागचे कारण म्हणजे जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या जीवनापासून अमेरिकन मुलांनी प्रेरणा घ्यावी व चांगला नागरिक बनावे हे होय. जॉर्ज वॉशिंग्टन यांनी एक प्रामाणिक व्यक्ती व चांगला नागरिक कसा असावा हे आपल्या स्वतःच्या वागणूकीतून व जीवनातून

दाखवून दिले होते. त्यामुळेच त्यांच्या प्रामाणिकते-विषयीच्या गोष्टी आजही अमेरिकेत सांगितल्या जातात. जॉर्ज वॉशिंग्टन हे अमेरिकन जनतेत सर्वात जास्त लोकप्रिय असलेल्या राष्ट्राध्यक्षांपैकी एक आहेत असे म्हणणे वावगे ठरू नये.

जॉर्ज वॉशिंग्टन हे एक श्रीमंत मळेदार होते. त्यांच्याकडे ७००० एकरहून जास्त शेतजमीन होती असे म्हणतात. ते स्वतः शेतांवर काम करणाऱ्या मजूरांसोबत काम करत असत. तसेच त्यांना आपल्या इस्टेटीवर वा शेतीवर घोड्याने रपेट मारण्याची आवड होती. जॉर्ज वॉशिंग्टन हे अतिशय उदारमतवादी होते. ह्याचे उदाहरण द्यायचे तर त्यांचा गुलामगिरीला व्यक्तिशः विरोध होता. मात्र, तत्कालीन सामाजिक व्यवस्थेमुळे त्यांना गुलामगिरीच्या संस्थेला पूर्णपणे झिडकारून देता आले नाही! परंतु, जॉर्ज वॉशिंग्टन यांचा समाजातील विविध लोकांशी प्रेमळपणे वागण्याचा स्वभाव होता असे जाणवते. जॉर्ज वॉशिंग्टन यांनी आपल्या मृत्यूपत्रात त्यांच्या सर्व गुलामांना मुक्त करण्याची तरतूद केली होती. असे करून त्यांनी १८ व्या शतकात एकप्रकारे गुलामगिरीच्या संस्थेविरूद्ध आपले मत नोंदविले होते असे म्हणणे सयुक्तिक ठरेल.

जॉर्ज वॉशिंग्टन यांचा जन्म २२ फेब्रुवारी १७३२ रोजी व्हर्जिनिया ह्या वसाहतीतील वेस्टमोरलँड (Westmoreland) ह्या प्रांतात झाला होता. असे म्हटले जाते की, जॉर्ज वॉशिंग्टन यांचे पणजोबा जॉन वॉशिंग्टन हे इंग्लंडहून अमेरिकेत आले होते. इंग्लंडमध्ये असताना देखील वॉशिंग्टन कुटुंब हे प्रतिष्ठित कुटुंब होते. ह्या कुटुंबाला इंग्लंडचा राजा आठवा हेन्री (१४९१-१५४७) ह्याने जमीन इनाम म्हणून दिली होती असे दाखले आपणास आढळतात. जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या आजोबांचे नाव लॉरेन्स वॉशिंग्टन हे होते. जॉर्ज वॉशिंग्टनच्या वडिलांचे नाव ऑगस्टाईन वॉशिंग्टन होते व त्यांचा जन्म १६९४ मध्ये झाला होता. ऑगस्टाईन वॉशिंग्टन हे उद्यमशील व महत्त्वाकांक्षी होते. त्यांनी मोठ्या प्रमाणात जमीन संपादीत केली होती. काही काळ ऑगस्टाईन वॉशिंग्टन यांनी लोखंडाच्या खाणी खणण्याचा देखील प्रयत्न केला होता. त्यांच्या पहिल्या पत्नीचे नाव जेन बटलर (Jane Butler) हे होते. त्यांना ह्या पत्नीपासून चार मुले झाली होती. जेन बटलर ह्यांचा मृत्यू १७२९ साली झाला व ऑगस्टाईन यांनी मेरी बॉल (Mary Ball) हिच्याशी विवाह केला. मेरी बॉलला ऑगस्टाईनपासून सहा मुले झाली व ह्या सहा अपत्यांपैकी जॉर्ज वॉशिंग्टन हे सर्वात मोठे होते. ऑगस्टाईन वॉशिंग्टन व मेरी बॉल यांच्या इतर पाच मुलांची नावे बेट्टी (Betty), सॅम्युअल (Samuel), जॉन ऑगस्टाईन (John Augustine), चार्ल्स (Charles) व मिल्डरेड (Mildred) अशी होती. अगोदर नमूद केल्याप्रमाणे जॉर्ज वॉशिंग्टन यांचे पणजोबा जॉन वॉशिंग्टन हे साधारणतः १६५६-५७ मध्ये व्हर्जिनिया येथे आले व त्यांनी तेथील पोटोमॅक (Potomac) नदीच्या आसपासच्या प्रदेशात स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. सुरुवातीस त्यांची आर्थिक स्थिती साधारण होती, मात्र वीस वर्षांच्या कालावधीत त्यांनी एकूण ५००० एकर एवढी जमीन कमावली. ह्या वॉशिंग्टन घराण्याचा इतिहास साधारणतः १२६० पासून मिळायला सुरुवात होते. त्यांचे त्यावेळी वेसिंग्टन (Wessington) असे नाव होते. ते नंतर अपभ्रंश होऊन वॉशिंग्टन (Washington) असे झाले. इंग्लंडमध्ये त्यांचे घर सुलग्रेव्ह मेनर (Sulgrave Manor) या नावाने प्रसिद्ध होते. ह्या घराचे सध्या वस्तुसंग्रहालयात रुपांतर करण्यात आले आहे. वॉशिंग्टन यांच्या पूर्वजांचे हे घर नॉर्थअॅम्पटनशायर (Northamptonshire) ह्या प्रांतात आहे.

आपण अगोदर पाहिलेच आहे की, जॉर्ज वॉशिंग्टन यांचा जन्म व्हर्जिनियामधील वेस्टमोरलँड येथील मळ्यावर झाला होता. जॉर्ज वॉशिंग्टन तीन वर्षांचे असताना

त्यांचे कुटुंब हे ठिकाण सोडून 'लिटल हटिंग क्रीक' या ठिकाणी गेले. ह्याच ठिकाणाचे नंतर माऊंट वेरनॉन (Mount Vernon) असे नामकरण झाले. हेच माऊंट वेरनॉन म्हणजे नंतरच्या काळातील जॉर्ज वॉशिंग्टन यांचे जगप्रसिद्ध निवासस्थान झाले. लहानपणापासूनच जॉर्ज वॉशिंग्टन यांना आपल्या इस्टेटीवरील व आसपासच्या जंगलात फिरण्याचा व शेतीवर घोड्यावरून रपेट मारून काम करण्याचा छंद होता व त्यांनी आपला हा छंद शेवटपर्यंत जोपासल्याचे निदर्शनास येते. १७३८ साली ऑगस्टाईन वॉशिंग्टन यांनी रॅप्पाहॅन्नॉक (Rappahannock) नदीच्या काठावर व्हर्जिनियातील फ्रेडरिक्सबर्ग (Fredericksburg) येथे २६० एकर जमीन विकत घेतली. वॉशिंग्टनांच्या ह्या इस्टेटीला फेरी फार्म (Ferry Farm) असे संबोधले गेले. वॉशिंग्टन कुटुंब १७३८ मध्ये येथे राहण्यास आले. यामागचे कारण म्हणजे ऑगस्टाईन वॉशिंग्टन हे लोखंडाच्या धंद्यातसुद्धा होते व जेथे त्यांचे लोखंड निर्मितीचे काम चाले तेथून हे ठिकाण जवळ होते. जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या शालेय शिक्षणाची सुरुवात फेरी फार्म येथे असतानाच झाली असावी असे इतिहासकार म्हणतात. वॉशिंग्टन यांनी साधारणतः सात ते आठ वर्ष शिक्षण घेतले असावे असे अनेक अभ्यासक मानतात. लहानपणापासून त्यांचा गणित हा विषय चांगला होता. जॉर्ज वॉशिंग्टन यांनी इतिहास तसेच भूगोल ह्या विषयांचादेखील अभ्यास केलेला होता. साधारणपणे वयाच्या १४ व्या ते १५ व्या वर्षी जॉर्ज वॉशिंग्टन यांनी आपल्या शालेय शिक्षणाला पूर्णविराम दिला. तोपर्यंत त्यांना आपल्या व्यवसायाचा लेखा-जोखा ठेवणे, स्पष्ट पत्रे लिहिणे इत्यादी कामे चपखलपणे जमत होती. असे म्हणतात की, ऑगस्टाईन वॉशिंग्टन यांचा जॉर्ज वॉशिंग्टनला इंग्लंडमधील एखाद्या चांगल्या शाळेत घालावयाचा मानस होता. परंतु ऑगस्टाईन यांचा मृत्यू झाल्यामुळे ही योजना बारगळली. लहानपणापासूनच जॉर्ज वॉशिंग्टन आपल्या मळ्यावर काम करणाऱ्या मजूरांचे व गुलामांचे निरीक्षण करत असत. त्यामुळे ते लहान असतानाच तंबाखू, फळफळावळ, धान्य, भाज्या इत्यादी कशा पेराव्यात व त्यांचे उत्पादन कसे घ्यावे ह्या गोष्टी शिकले होते. त्यांना लहानपणापासून घोड्यावर रपेट मारण्याची तसेच शिकार करण्याची, मासेमारी करण्याची व नदीतून बोटीने फिरण्याची आवड होती. वॉशिंग्टन हे सुरुवातीपासूनच स्वभावाने फार शांत होते. ते कुठलीही गोष्ट अतिशय लक्ष देऊन ऐकत असत. त्यांचे वागणे आदबशीर होते व ते थोरा-मोठ्यांना मान देऊन बोलत वागत असत. त्याचप्रमाणे त्यांना एखादी गोष्ट सांगितल्यावर दुसरी व्यक्ती त्याबाबत निर्धास्तपणे वॉशिंग्टन यांच्यावर विसंबून राहू शकत असे, कारण वॉशिंग्टन एखादे काम दिल्यावर शंभर टक्के करतीलच असा इतरांना त्यांच्याविषयी विश्वास होता, वा तसा विश्वास असे.

जॉर्ज वॉशिंग्टन यांच्यावर त्यांचे सावत्र बंधू लॉरेन्स वॉशिंग्टन यांचा खूप प्रभाव होता. लॉरेन्स यांचे शिक्षण इंग्लंडमध्ये झालेले होते. त्यामुळे त्यांच्या वागण्या-बोलण्यात इंग्रजांचा सुसंस्कृतपणा दिसत असे. १७४० ते १७४२ ह्या कालावधीत लॉरेन्स ग्रेटब्रिटन व स्पेन या देशांच्या दरम्यान जे युद्ध झाले होते त्या दरम्यान स्वयंसेवक म्हणून दक्षिण अमेरिकेत गेले होते. त्यांनी लढायांत प्रत्यक्षात सहभाग घेतला नव्हता. मात्र, त्यांनी व्हर्जिनियाला परत आल्यानंतर जॉर्ज वॉशिंग्टन यांना ह्या युद्धा दरम्यानच्या अनेक चित्तथरारक कथा सांगितल्या होत्या. त्यामुळे सुरुवातीपासूनच वॉशिंग्टन यांना सैनिकी जीवन व युद्धकलेविषयी आकर्षण निर्माण झाले होते व त्याचे श्रेय त्यांचे बंधू लॉरेन्स यांना जाते असे म्हणणे वावगे ठरू नये. आपल्या आयुष्याच्या नंतरच्या काळात जॉर्ज वॉशिंग्टन ब्रिटिशांसाठी रेड इंडियन तसेच फ्रेंच लोकांविरुद्ध लढले. तसेच त्यांनी अमेरिकेच्या सैन्याचे अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धात ब्रिटिशांच्या सैन्याविरुद्ध यशस्वी नेतृत्व केलेले आढळते. त्यांच्या ह्या देदिप्यमान

ज्या दुर्गुणाचा कुणाला त्रास होत नाही, तो दुर्गुण नव्हे. - माँटेग्ने

लष्करी/सैनिकी कारकीर्दीची बीजे लॉरेन्स ह्यांनी सांगितलेल्या युद्धकथांमध्ये होती असे म्हणणे अतिशयोक्ती ठरू नये. लॉरेन्सने आपल्या वडिलोपार्जित इस्टेटीवर एक मोठे व आकर्षक घर बांधले होते. ह्या घराला 'माऊंट वेरनॉन' (Mount Vernon) असे संबोधले गेले. जॉर्ज वॉशिंग्टन लहानपणापासून अनेकदा आपल्या भावाला भेटण्यासाठी माऊंट वेरनॉनला भेट देत असत.

सुरुवातीच्या काळात जॉर्ज वॉशिंग्टन यांनी कुठल्या क्षेत्रात आपली कारकीर्द करावी ह्यावरून त्यांच्या कुटुंबात एकमत नव्हते. त्यांचे बंधू लॉरेन्स यांना जॉर्जने 'ब्रिटिश रॉयल नेवी' (British Royal Navy) म्हणजेच ब्रिटिशांच्या नौदलात जावे असे वाटत होते, मात्र जॉर्जच्या आईचा याला विरोध होता. शेवटी जॉर्ज वॉशिंग्टन यांनी 'सर्व्हेयर' (Surveyor) होण्याचे ठरविले. १८ व्या शतकात अमेरिकेत सर्व्हेयरांना मोठ्या प्रमाणात मागणी असे. हे 'सर्व्हेयर' मोठमोठ्या मळेदारांना व शेतकऱ्यांना जमिनीची मोजदाद करून देणे व तिचे मूल्य ठरविणे अशाप्रकारची कामे करत असत. वयाच्या १५ व्या वर्षापासून जॉर्ज वॉशिंग्टन यांनी हे काम शिकण्याची वा त्याविषयीचा अभ्यास करण्याची सुरुवात केली. लॉर्ड फेयरफॅक्स (Lord Fairfax) यांनी तरुण जॉर्जला सुरुवातीस 'सर्व्हेयर'चे काम दिले. लॉर्ड फेयरफॉक्स हे लॉरेन्स वॉशिंग्टन यांच्या पत्नीच्या नातेवाईकांपैकी होते. जॉर्ज यांनी मार्च १७४८ पासून 'सर्व्हेयर'ची कारकीर्द सुरू केली. ह्या कामासाठी त्यांना भरघोस मोबदला मिळत असे. १७४९ ते १७५२ ह्या कालावधीत जॉर्ज वॉशिंग्टन यांनी 'सर्व्हेयर' म्हणून खूप मोठ्या प्रमाणात काम केले व येणाऱ्या पैशांतून जमिनी विकत घेण्यास सुरुवात केली. अशा तऱ्हेने १७५२ पर्यंत ते जवळ-जवळ २३०० एकर जमिनीचे मालक झाले. जून १७५२ मध्ये जॉर्ज यांच्या आयुष्यातील एक दुःखद घटना घडली. ही घटना म्हणजे त्या वर्षी त्यांचे वडिलबंधू लॉरेन्स वॉशिंग्टन यांचा मृत्यू झाला. लॉरेन्स यांना क्षयरोग झाला होता. लॉरेन्स यांनी आपली माऊंट वेरनॉनची मालमत्ता त्यांच्या पत्नीला मिळावी व तिच्या पश्चात त्यांच्या कन्येला मिळावी अशी तरतूद केली होती. लॉरेन्स यांच्या कन्येला जर अपत्य झाले नाही तर मग ती मालमत्ता जॉर्जना मिळावी अशीसुद्धा व्यवस्था लॉरेन्स यांनी केली होती. लॉरेन्स यांनी आपल्या तीन भावांसोबत जॉर्ज वॉशिंग्टन यांच्यासाठी शेनानडोआह खोऱ्यातील (Shenandoah Valley) मालमत्तेचादेखील समान हिस्सा ठेवला होता.

१७५३ ते १७५८ ह्या कालावधीत जॉर्ज वॉशिंग्टन यांनी व्हर्जिनिया वसाहतीच्या सैन्यामध्ये सेवा केल्याचे आढळते. १७५३ मध्ये व्हर्जिनियाचे तत्कालीन हंगामी राज्यपाल रॉबर्ट डिनविड्डी (Robert Dinwiddie) यांनी जॉर्ज वॉशिंग्टन यांना पहिल्यांदा सैन्यामध्ये सेवा करण्याची संधी दिली. सैन्यात भरती झाल्यानंतर वॉशिंग्टन यांनी ब्रिटिशांच्यावतीने पश्चिमेकडील सरहद्दीवर रेड इंडियन टोळ्या व फ्रेंचांविरूद्ध लढादेखील दिला. वॉशिंग्टनच्या सैनिकांनी अमेरिकन वसाहतींच्या पश्चिम सीमेलगत फोर्ट नेसेसिटी (Fort Necessity) नामक किल्ला बांधलेला होता. जॉर्ज वॉशिंग्टन यांना सुरुवातीच्या काळातील हा लष्करी व लढायांचा अनुभव पुढील काळात अमेरिकन स्वातंत्र्य युद्धादरम्यान निश्चितच उपयुक्त ठरला असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

१७५९ च्या आसमास जॉर्ज वॉशिंग्टन यांनी निदान काही कालावधीसाठी तरी लष्करी कारकीर्दीतून विश्रांती घेण्याचे ठरविले व ते पुन्हा एकदा आपल्या माऊंट वेरनॉन येथील वडिलोपार्जित इस्टेटीकडे वळले. त्यांनी आता आपल्या मळ्यावर शेतकऱ्याचे जीवन जगण्याचे ठरविले होते.

६ जानेवारी १७५९ रोजी जॉर्ज वॉशिंग्टन श्रीमती मार्था डँड्रीज् कस्टीस (Mrs. Martha Dandridge Custis) ह्या विधवेशी विवाहबद्ध झाले. सौ. मार्था ह्या

वयाने जॉर्ज वॉशिंग्टन यांच्यापेक्षा आठ महिन्यांनी मोठ्या होत्या व जॉर्ज यांच्याशी विवाहाच्यावेळी त्या विधवा होत्या. मार्था ह्यांना आपल्या पहिल्या पतीपासून जॉन 'जॅकी' पार्क कस्टीस (John 'Jackie' Parke Custis) व मार्था 'पस्टी' पार्क कस्टीस (Martha 'Pasty' Parke Custis) ही दोन अपत्ये होती. जॉर्ज वॉशिंग्टन ह्यांनी ह्या दोन मुलांना खूप चांगल्याप्रकारे वागवून त्यांना पित्याचे प्रेम दिल्याचे आढळते. ह्याच सुमारास जॉर्ज वॉशिंग्टन यांनी व्हर्जिनियाच्या राजकारणात सक्रिय होण्यास सुरुवात केली. ते व्हर्जिनियाच्या असेंब्लीचे सदस्यसुद्धा झाले. त्यांच्या ह्या असेंब्लीच्या सदस्यत्वाच्या कालावधीत वा कारकीर्दीतच त्यांचा थॉमस जेफरसन, पॅट्रीक हेन्री व व्हर्जिनियातील इतर विद्वानांशी व राजकारण्यांसोबत संबंध आला व स्नेह जुळला.

वॉशिंग्टन हे अतिशय हुशार उद्योजक व मेहनती शेतकरी होते. ते आपल्या शेतीत वेगवेगळे व नवनवीन प्रयोग करत असत. आधुनिक शेतीविषयी माहिती मिळावी म्हणून ते सतत ह्याविषयावरची पुस्तके वाचत असत. त्यांच्या जेव्हा लक्षात आले की, त्यांच्या शेतीवर उत्तम प्रतीच्या तंबाखूचे पीक घेता येत नाही तेव्हा ते गव्हाची शेती करू लागले. त्याचप्रमाणे त्यांनी आपल्या शेतावर फळबागा लावलेल्या होत्या. जॉर्ज वॉशिंग्टन यांचा मित्रांचा गोतावळा फार मोठा होता. त्यांच्या माऊंट वेरनॉन ह्या घरी नेहमीच अनेक लोक येत असत व विविध खेळ खेळत असत व शिकारीस जात असत. वॉशिंग्टन यांना नाटके पाहण्याची, घोड्यांच्या शर्यती पाहण्याची तसेच खरेदी करण्याची आवड होती.

जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या व्यक्तिमत्त्वात एक विशेष प्रकारचे वैशिष्ट्य होते ज्यामुळे त्यांच्याकडे अनेक लोक आकर्षित होत व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने भारावून जात असत. असे म्हटले जाते की, अमेरिकन जनतेने त्यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य युद्ध जिंकण्यापूर्वीच आपल्या मुलांचे वॉशिंग्टन असे नाव ठेवण्यास सुरुवात केली होती व त्यांना 'देशाचे राष्ट्रपिता' सुद्धा म्हणण्यास सुरुवात केली होती. त्यांचे राष्ट्रप्रेम व राष्ट्रनिष्ठा ही वादातीत होती. त्यामुळेच ते जनतेमध्ये खूप लोकप्रिय होते. एक सेनापती म्हणून ते नेपोलियनच्या तोडीचे नसले तरी त्यांना आपल्या सैनिकांचा आत्मविश्वास उंचावण्याची कला अवगत होती व कोणत्याही कठीण परिस्थितीत ते स्वतःचा मानसिक तोल ढळू देत नसत. त्यांच्या ह्या गुणांच्या बळावर त्यांनी ब्रिटिशांच्या सैन्याचा पराभव करण्याची किमया साध्य केली होती. त्यांच्या ह्या विजयामुळेच त्यांची जगातील सर्वश्रेष्ठ सेनापतींमध्ये गणना केली जाते. त्यांनी आपल्या सैन्याला बाका प्रसंगी एकत्र ठेवण्याचे, सैनिकांचा अनाठायी बळी जाऊ न द्यायचे व शत्रू एखाद्या लढाईत प्रबळ ठरत असेल तर माघार घेण्याचे तंत्र वापरले. त्यांच्या ह्या धारेणीपणामुळेच अमेरिका इंग्रज सैन्यावर मात करू शकली. बोलघेवडेपणा करण्यापेक्षा 'कृतीत विश्वास ठेवणारी व्यक्ती' अशी त्यांची ख्याती होती. इतिहासकार म्हणतात की, 'कदाचित वॉशिंग्टन यांच्याशिवाय देखील अमेरिकेने स्वातंत्र्य युद्धात विजय मिळविला असता; मात्र अमेरिका ह्या राष्ट्राची उभारणी जॉर्ज वॉशिंग्टन यांच्याशिवाय शक्यच नव्हती.'

अमेरिका स्वतंत्र झाल्यानंतर १७८९ साली अमेरिकेत पहिल्यांदा राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक झाली. ह्या निवडणुकीत जॉर्ज वॉशिंग्टन हे एकमताने राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आले तर जॉन ॲडम्स यांना ३४ मते मिळाल्यामुळे ते पहिले उपराष्ट्राध्यक्ष झाले. ३० एप्रिल १७८९ रोजी वॉशिंग्टन यांनी न्यू यॉर्क शहरातील फेडरल हॉलमध्ये राष्ट्राध्यक्षपदाची शपथ घेतली. सुरुवातीच्या काळात न्यू यॉर्क हे शहर अमेरिकेची राजधानी होती व कालांतराने फिलाडेलफिया ह्या शहरात राजधानी हलविण्यात आली. वॉशिंग्टन डी. सी. ह्या अमेरिकेच्या भविष्यातील व सद्यस्थितीतील राजधानीचे निर्माण

प्राचीन जग क्रूरतेबद्दल प्रसिद्ध होते, तर आजचे आधुनिक जग पोकळ गर्वाबद्दल प्रसिद्ध आहे! – जॉर्ज मूर

करण्याचे कामसुद्धा ह्याचकाळात सुरू झाले. असे म्हणतात की, जॉर्ज वॉशिंग्टन राष्ट्राध्यक्ष असताना व राष्ट्राध्यक्ष म्हणून निवृत्त झाल्यावरसुद्धा वॉशिंग्टन डी.सी. ह्या शहराच्या निर्माणाच्या कामाची जातीने देखरेख करत असत. वॉशिंग्टन राष्ट्राध्यक्ष असताना त्यांना भेटण्यासाठी अनेक मान्यवर येत असत व संध्याकाळी व रात्री अनेक मेजवान्या दिल्या जात. हे सर्व कार्यक्रम रात्री नऊ वाजण्यापूर्वी संपत असत. कारण वॉशिंग्टन दररोज रात्री नऊ वाजता झोपत असत.

जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या कारकीर्दीत त्यांना जॉन जे (John Jay), थॉमस जेफरसन (Thomas Jefferson), हेन्री नॉक्स (Hanry Knox), अलेक्झांडर हॅमिल्टन (Alexander Hamilton), एडमंड रँडोल्फ (Edmand Randolph) इत्यादी सक्षम नेत्यांनी साथ दिली होती व हे सर्वजण वॉशिंग्टन यांच्या मंत्रिमंडळातील मंत्री होते.

सुरुवातीस अमेरिकेत राजकीय पक्ष नव्हते व वॉशिंग्टन कुठल्याही पक्षाचे सदस्य नव्हते. परंतु काही काळानंतर अमेरिकेत फेडरलिस्ट (Federalist) व डेमॉक्रेटिक-रिपब्लीकन (Democratic - Republican) असे दोन पक्ष अस्तित्वात आले. अलेक्झांडर हॅमिल्टन हे फेडरलिस्ट पक्षाचे प्रतिनिधीत्व करत असत. तर थॉमस जेफरसन यांची डेमॉक्रेटिक-रिपब्लीकन ह्या पक्षाला सहानुभूती होती. नंतरच्या काळात हॅमिल्टन व जेफरसन यांच्यात वैचारिक वाद होऊन खटके उडू लागले तेव्हा वॉशिंग्टन यांना काळजी वाटत असे.

जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या कारकीर्दीत जे अनेक महत्त्वाचे निर्णय व भरीव कामगिरी झाली त्यापैकी एक म्हणजे अमेरिका व इंग्लंड यांच्यादरम्यान झालेला 'जे तह' (Jay Treaty) होय. फ्रान्सने अमेरिकेला क्रांतीदरम्यान वा अमेरिकन स्वातंत्र्य युद्धादरम्यान भरपूर मदत केली होती. त्यामुळे १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीनंतर जेव्हा इंग्लंडने फ्रेंच प्रजासत्ताका विरोधात स्पेन व इतर राष्ट्रांच्या सोबतीने आघाडी उघडली तेव्हा अमेरिकेने इंग्लंडविरुद्ध फ्रान्सला मदत करावी अशी फ्रेंच राज्यकर्त्यांची अपेक्षा होती. जेफरसन वगैरे मंडळींचीसुद्धा हीच अपेक्षा होती. परंतु वॉशिंग्टन यांचे मत नुकत्याच स्वतंत्र झालेल्या अमेरिकेसारख्या नवराष्ट्राने इंग्लंडसारख्या प्रबळ देशासोबत वैर घेऊ नये असे होते. त्यामुळे त्यांनी अमेरिकेचे सरन्यायाधीश जॉन जे यांना इंग्लंडसोबत चर्चा करून मैत्री तह करण्याच्या कामगिरीवर धाडले. १७९४ मध्ये जे यांनी अनेक महिने इंग्लंडमध्ये राहून तहाची चर्चा केली व अमेरिका व इंग्लंड दरम्यान एक तह घडवून आणला. हा तह इतिहासात 'जेंचा तह'(Jay's Treaty) म्हणून प्रसिद्ध आहे. डॅमॉक्रेटिक-रिपब्लीकन लोक ह्या तहामुळे नाराज झाले. ह्या गटातील अनेकांना हा तह इंग्लंडच्या फायद्याचा आहे असे वाटत होते. परंतु येथे वॉशिंग्टन यांची दूरदुष्टी कामास आली. वॉशिंग्टन यांनी हा तह अमेरिकेच्या संसदेचे वरिष्ठ दालन म्हणजेच 'सिनेट'कडे मान्यतेसाठी पाठविला व 'सिनेट'ने 'जे तहाला' २४ जून १७९५ रोजी मान्यता दिली. सुरुवातीच्या काळात जरी ह्या तहाचे जास्तीत जास्त फायदे इंग्लंडला मिळतील असे वाटत असले तरी भविष्यात ह्या तहामुळे इंग्लंड-अमेरिकेचे संबंध सुधारण्यास मदत झाली व ह्या दोन देशांमधील व्यापारसुद्धा मोठ्या प्रमाणात वाढला ज्याचा फायदा अमेरिकेलादेखील झाला. इंग्लंड-अमेरिकेचे सद्यस्थितीत जे मैत्रीपूर्ण संबंध आहेत त्याची सुरुवात 'जे तहाने' झाली असे म्हणणे वावगे ठरू नये. सप्टेंबर १७९६ च्या आसपास वॉशिंग्टन यांनी सक्रीय राजकारणातून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला. वॉशिंग्टन यांनी राजकारणातून निवृत्ती घेतल्यानंतर त्यांनी पुढील राष्ट्राध्यक्ष म्हणून जॉन ॲडम्स् यांच्या उमेदवारीला पसंती दर्शविली होती. जॉन ॲडम्स् यांना ७१ तर थॉमस जेफरसन यांना ६८ मते पडली. त्यामुळे वॉशिंग्टन यांच्यानंतर जॉन

ॲडम्स् हे राष्ट्राध्यक्ष तर थॉमस जेफरसन उपराष्ट्राध्यक्ष झाले.

राष्ट्राध्यक्ष म्हणून निवृत्त झाल्यानंतर जॉर्ज वॉशिंग्टन आपल्या माऊंट वेरनॉन ह्या वडिलोपार्जित इस्टेटीवर गेले व शेतकरी म्हणून जीवन व्यतीत करू लागले. परंतु जेव्हा अमेरिका व फ्रान्स यांच्यामधील संबंध बिघडून विकोपाला जाण्यास सुरुवात झाली तेव्हा राष्ट्राध्यक्ष जॉन ॲडम्स् यांनी अमेरिकेसाठी मोठे सैन्य उभारण्यासाठी जॉर्ज वॉशिंग्टन यांना मदत करण्याची विनंती केली. त्यावेळी जॉर्ज वॉशिंग्टन मनात कुठलाही अहंभाव न ठेवता चटकन जॉन ॲडम्स् यांच्या व आपल्या राष्ट्राच्या मदतीला धावून गेले. जॉन ॲडम्स् यांनी जॉर्ज वॉशिंग्टन यांची लेफ्टनंट जनरल व कमांडर-इन-चीफ (सरसेनापती) म्हणून नियुक्ती केली!

१२ डिसेंबर १७९९ रोजी वॉशिंग्टन यांनी आपल्या आयुष्यातील शेवटचे पत्र लिहिले. त्यांनी हे पत्र अलेक्झांडर हॅमिल्टन यांना लिहिले होते. हे पत्र लिहून संपविल्यानंतर वॉशिंग्टन नेहमीच्या सवयीप्रमाणे घोड्यावर बसून शेतीवर रपेट मारून येण्यासाठी गेले. त्यादिवशी हवेत जरा जास्तच गारवा होता व तापमान खूप कमी झाले होते. तसेच, बर्फ पडून थोड्यावेळाने पाऊस पडण्याससुद्धा सुरुवात झाली होती. वॉशिंग्टन ह्या पावसात घोड्यावरून रपेट मारताना भिजले. वॉशिंग्टन जवळ-जवळ पाच तासांनी घरी आले व ओल्या कपड्यानेच रात्रीच्या भोजनास बसले. दुसऱ्या दिवशी सकाळी जेव्हा ते उठले तेव्हा त्यांना घशाचा त्रास जाणवत होता तरी ते बाहेर चालण्यास गेले व त्यानंतर आपल्या रोजनिशीत त्यादिवशीच्या हवामानाविषयीची नोंद केली. हे त्यांच्या आयुष्यातले शेवटचे लिखाण ठरले. १४ डिसेंबर १७९९ च्या मध्यरात्रीनंतर वॉशिंग्टन यांनी आपली पत्नी मार्था हिला झोपेतून उठविले. त्यावेळी त्यांना बोलण्यास त्रास होत होता. परंतु त्यांनी मार्थाला पहाटेपर्यंत डॉक्टरांना बोलावणे पाठवू दिले नाही. जोपर्यंत वॉशिंग्टन यांचे डॉक्टर जेम्स क्रेक (James Craik) व इतर डॉक्टर आले तोपर्यंत त्यांची तब्येत खूपच खालावली होती. शेवटी वॉशिंग्टन यांना कळून चुकले की आपला मृत्यू समीप येऊन ठेपला आहे. त्यामुळे ते आपल्या डॉक्टरांना म्हणाले की, 'तुम्ही माझ्यासाठी अजून जास्त त्रास घेऊ नका; मला शांतपणे जाऊ द्या; मी जगेन असे वाटत नाही'. हे मूळ इंग्रजी वाक्य वर्ल्ड एनसायक्लोपिडियात (Word book Encyclopedia) पुढीलप्रमाणे दिलेले आहे –

"You had better not take any more trouble about me; but let me go off quietly; I cannot last long."

त्याचदिवशी रात्री दहाच्या सुमारास वॉशिंग्टन आपल्या सचिवाला उद्देशून कुजबुजले की, ''मी आता जात आहे. मला चांगल्या रीतीने वा सन्मानाने मूठमाती देण्यात यावी व माझ्या मृत्यूनंतर दोन दिवसांच्या अगोदर माझे मृत शरीर थडग्यात ठेवण्यात येऊ नये. तुला मी जे बोलतो आहे ते कळले का?'' त्यांचा सचिव ''होय सर'' म्हणाला व वॉशिंग्टन यांची प्राणज्योत मालवली. हा सर्व इंग्रजीतील मूळ संवाद वर्ल्डबुक एनसायक्लोपिडियात (Word Book Encyclopedia) पुढीलप्रमाणे दिलेला आहे,

"I am just going. Have me decently buried, and do not let my body be put in the vault in less than two days after I am dead. Do you understand me?" His secretary answered, "Yes sir".

जॉर्ज वॉशिंग्टन यांचा दफनविधी शाही इतमामात १८ डिसेंबर १७९९ रोजी झाला. माऊंट वेरनॉन येथे त्यांची समाधी (थडगे) बांधण्यात आली. असे म्हणतात की, वॉशिंग्टन यांच्या मृत्यूमुळे सर्व अमेरिका शोकात बुडाली व लोक कित्येक महिने काळे कपडे घालून वॉशिंग्टन यांच्या मृत्यूचा दुखवटा पाळत होते. अमेरिकेच्या ह्या महान सुपुत्राच्या सन्मानार्थ अमेरिकेच्या एक डॉलरच्या

नोटेवर त्यांचे छायाचित्र छापण्यात आले. तसेच अमेरिकेची जी पोटेमॅक नदीच्या किनाऱ्यावर नवीन राजधानी बांधण्यात आली त्या राजधानीलासुद्धा वॉशिंग्टन यांच्या सन्मानार्थ 'वॉशिंग्टन डी. सी.' असे नाव देण्यात आले. तसेच अमेरिकेच्या कॅनडा लगत असलेल्या वायव्य दिशेकडील एका राज्याला वॉशिंग्टन असे नाव देण्यात आले. ह्या राज्याची राजधानी ऑलिंपिया (Olympia) हे शहर असून येथे वाचकांना असे सांगावेसे वाटते की, वॉशिंग्टन राज्यातील रेडमॉन्ड (Redmond) (रेडमॉन्ड हे शहर सिएटल-Seattle ह्या मोठ्या शहराचा एक घटक आहे) ह्या शहरात अमेरिकेच्या मायक्रोसॉफ्ट ह्या जगप्रसिद्ध माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपनीचे मुख्यालय आहे. असो. जॉर्ज वॉशिंग्टन यांच्याबाबत असे म्हणणे सयुक्तिक ठरेल की, अमेरिकेला स्वातंत्र्य मिळवून देण्यामध्ये व ह्या देशातील लोकशाही तसेच इतर सार्वजनिक संस्था मुळातून उभारून त्या प्रबळ करण्याचे श्रेय जॉर्ज वॉशिंग्टन यांना जाते. अमेरिकेच्या ह्या महान सुपुत्राला व जगाच्या इतिहासातील एका महान नेत्याला सलाम!

**संदर्भ :**


- द अमेरिकन नेशन अ हिस्ट्री ऑफ द युनायटेड स्टेटस् : जॉन ए. गॅराटी
- हिस्ट्री ऑफ द वर्ल्ड : बी. व्ही. राव
- वर्ल्डबुक एनसायक्लोपेडिया



**- सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email :subhashinscotland@gmail.com


•••

(पृष्ठ क्रमांक १२ वरून - **नर्मदा परिक्रमा**)

दिंडोरीला उतरल्यावर प्रथम मोबाईल दुरुस्त करून घेतला. (१००रु.) हे काम इतके नाजूक व अवघड आहे की मुटण्याफुटण्याची भीती अधिक. स्क्रूसुद्धा अगदी लहान लहान! स्वीच (जो फक्त ५ रु.चा) बदण्याचे १०५ रु. मी स्वतःहून देऊ केले पण गोविंदसिंगने ठरल्यानुसार १०० रु.च घेतले.

सकाळपासून उपाशी! चहासुद्धा नाही. वाटेत ५/६ बिस्किटे व एक सफरचंद खाल्ले होते. उतरलो तेव्हा भुकेने व्याकुळ होतो.

प्रथम निवारा शोधावा म्हणून स्वीच दुरुस्तीनंतर प्रथम नदीकिनारा गाठला व धर्मशाळेचा शोध सुरू करणार तोच 'येथे परिक्रमावासीयांना भोजन दिले जाईल' अशा अर्थाचा हिंदी मजकूर भिंतीवर पाहिला व थांबलो; तोच अगदी अगत्याने एका बाबाने माझे स्वागत करून ८/१० माणसे झोपतील अशी ८'X२०' ची खोली मला दिली.

आरंभी मी एकटाच होतो. नंतर तीन साधू (त्यातला रामगिरी हा नाशिकचा, जन्म शिक्षण दहिसरचे) व दोन U.P. मधून काही कारणाने आलेले शेतकरी मुक्कामी आले.

भोजनात भात-वरण बट्टी होती. संध्याकाळी मी सामान ठेवून बाजारात गेलो होतो. तिथून किलोभर बटाटे घेतले व स्वयंपाक घरात दिले.

भूक लागल्याने बाजारात एक मुळा व काही ओले उकडलेले शिंगाडे खाल्ले व चहा प्यायलो होतो.

धर्मशाळा नीटनेटकी पण साधी, स्वच्छ आहे. शबनम टाकून मी जायचा धोका पत्करला नाही. ५।। वाजताच मैय्यापूजन झाले होते.

संध्याकाळी चहा व रात्री डालबाटी, भात व कोशिंबीर असा उत्तम बेत होता.


**- अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

# प्रेम रुळतसे बोलता ...

*प्रेम आणि मोह यांना एकत्र आणलं की काय अनर्थ होतात, हे काय सांगायला हवं? प्रेमाचं जग वेगळंच असतं, तिथं मोहाला प्रवेश नसतो. प्रेम आणि मोह यांचा ऊहापोह या लेखात केला आहे– संपादक*

प्रेम करावं कृष्णानं, प्रेम करावं बुद्धानं, प्रेम करावं येशूनं. प्रेम करणं आपल्याला कधी जमलंय का? आपण मोहालाच प्रेमाचे कपडे घालतो. मोह काहीतरी मागत असतो, तर प्रेम देत राहातं...

प्रेम! एकरूप अनंताला स्वतःचंच दर्शन घ्यावं तेही अनेक रूपांत असं वाटलं, तेव्हा त्यानंच प्रेमभावनेची निर्मिती केली. सृजन हे ईश्वरी भावनेचं आणि सामर्थ्याचं उत्तुंग दर्शन आहे. प्रेमभावना ही सृजनाची गंगोत्री आहे. प्रेमदानात सृष्टीचं सातत्य राखणारं सारं मांगल्य आहे. 'गीतगोविंद'कार जयदेव हा संस्कृत कवी म्हणतो, 'जेव्हा राधा कृष्णाजवळ जाते, तेव्हा त्यांच्यामध्ये उभं राहायला लाजेलाच लाज वाटते!'

या प्रेमाची जात कोणती? आपल्या संस्कृतीत 'जाती'ला फार प्रतिष्ठा आहे. यशासाठी आणि दैवाची कृपा लाभण्यासाठी जात हवीच. पक्ष्यांच्या, फुलाफळांच्या जाती आहेतच. कृष्णाच्या प्रेमाची जात ज्ञानाच्या भाषेत 'आध्यात्मिक' म्हणता येऊ शकते, ज्या हृदयात कामभावना नाही त्या हृदयात प्रेमभावना फुलते. जो देऊ शकतो पण मागत नाही, तो प्रेमी! वासना मागते. तिची मागणी संपत नाही. प्रेम म्हणतं, 'बस! आता काही नकोय मला. मी तृप्त आहे'. वासना भिकारीण, तर प्रेम सम्राट चक्रवर्ती. प्रेम सांगतं, 'माझ्याकडे जे आहे ते घेऊन जा. मला काही नकोय'. याला म्हणतात दानवृत्ती. वासनेकडे भिक्षावृत्ती आहे. भिक्षावृत्ती आली की कलह माजतो. प्रेम कलहाचा नाश करतं. प्रेमाला वाटतं घ्यायचं असेल तर घ्या. आनंद आहे. नसेल घ्यायचं, तर राग नाही. वासना मात्र असं मानत नाही. तिला घ्यायचंच ठाऊक असतं. म्हणून जे लोक मागतात ते आपल्या अंतरात घर करत नाहीत, तर हृदयाला घरं पाडतात! वासनेला काही मिळालं नाही की तिचा जीव कासावीस होतो. ती कायम अपूर्ण राहाते, कारण ती नेहमीच अतृप्त असते.

मोह निर्माण होतो वासनेच्या प्रवाहात. प्रेमानं जन्म घेतल्यावर वासनेची नदी आटून जाते. मोहानं स्मरणशक्तीचा ऱ्हास होतो, तर प्रेमानं ती अधिक सुदृढ होते. नष्ट होणं आणि पुष्ट होणं यातील फरक स्पष्ट झाल्यानं आपण कुठल्या पायरीवर आहोत याचं आत्मभान येतं. उच्च विचारसरणीनं शिखर गाठायचं की उतारावर नीचतेकडे वाहात जायचं हे ज्ञानही अर्थातच 'प्रेमस्वरूप' झाल्यावरच प्राप्त होतं. मोहामुळे स्वभाव विक्षिप्त होतो, तर प्रेमामुळे माणूस विमुक्त होतो.

परिपूर्ण प्रेमभावनेचा कवी रॉबर्ट ब्राऊनिंग हा उत्तुंग अपयशाचा रगेल आशावादी इंग्लिश कवी. ईश्वरावरील अनन्य भक्ती, सत्याबद्दलची नित्यजिज्ञासा आणि प्रेमाबद्दल वाटणारी उत्कट आस्था या तीन निष्ठा त्याला प्रेरणादायी ठरल्या. जीवनावर अपार प्रेम करणाऱ्या या कवीनं सुमारे साठ वर्षं कविता लिहिल्या.

एलिझाबेथ बॅरेट नावाची एक कवयित्री होती. तिला ब्राऊनिंगच्या कविता अतिशय प्रिय होत्या. लहानपणी ती घोड्यावरून पडल्यामुळे पंगू झाली होती. १८४५ मध्ये दोघांची पहिली भेट झाली. दोघांची दोस्ती झाली. ती त्याच्यापेक्षा सहा वर्षांनी मोठी होती. मैत्रीचं रूपांतर प्रेमात झालं.

तिच्या घरच्या लोकांचा त्यांच्या लग्नाला विरोध होता. तरीही १२ सप्टेंबर १८४६ रोजी त्यांनी विवाह केला. १८४९ मध्ये त्यांना मुलगा झाला.

'प्रेम ही एक अशी शक्ती आहे, जी आत्म्याला पावित्र्य आणि सामर्थ्य प्राप्त करून देते. पार्थिव प्रेम ही दैवी प्रेमाची केवळ सावली असते. प्रेमभावनेचा अखेरचा आविष्कार दैवी प्रेमातच होतो;' हे त्याचे विचार सहज अंतर्मुख करतात. प्रेमिकांमधील समंजसपणा, परस्पर विश्वास, दीर्घ सहवासातून प्रेमाला आलेली प्रगल्भ परिपक्वता यांचं चित्रण त्याच्या कवितेतून बघायला मिळतं. इटालियन महाकवी दान्ते यानं आपल्या प्रेयसीला अमर करण्यासाठी रंगरेषांच्या माध्यमातून तिचं चित्र रेखाटलं. जगप्रसिद्ध चित्रकार राफेल यानं आपल्या पत्नीवर 'सुनीतं' लिहिली.

१८६१ मध्ये एलिझाबेथ ख्रिस्तवासी झाली. म्हणून तो आपल्या बारा वर्षांच्या मुलास इटलीहून लंडनला घेऊन आला. त्यांच्या सेवेसाठी ब्राऊनिंगची बहीण आली. १२ डिसेंबर १८८९ रोजी तो ख्रिस्तवासी झाला. मधल्या काळात त्याचं काव्यलेखन सुरू होते, पण पत्नी गेल्यावर त्याच्या काव्यातला 'प्राण' गेला! त्यानं तीन नाटकं लिहिली. शेक्सपियर नंतर ब्राऊनिंगचं नाव घेतलं जातं. त्याची कविता कृतार्थ आणि सफल प्रेमाचं प्रतीक आहे. राजकवी भा. रा. तांबे यांनी जशा पत्नीवर अनेक कविता लिहिल्या आहेत, तशा ब्राऊनिंगनेही केल्या आहेत. त्या वाचताना एलिझाबेथची आठवण येते.

सामान्य माणसं कविता करत नसतील, पण ती कविता जगत असतात. अनेकांना प्रेमाचा अर्थ सांगता येणार नाही, पण त्यांच्या प्रेमात त्यांना जीवनाचा अर्थ नक्की गवसत असेल. सामान्यांची 'प्रेमाची ज्ञानेश्वरी' असामान्य असते. 'रोसे प्रेम दुणावटे' म्हणजे रुसल्यानं प्रेम दुप्पट वाढतं, हे प्रेमिकांना कळल्यावर 'लटका राग' म्हणजे काय अन् तो सुंदर जीवघेणा छळ हवाहवासा वाटतो. ज्ञानेश्वर म्हणतात,

**आता आवडी जेथ पडे।**
**तेयाचि अवसरी पुढे पुढे।**

**रिगो लागे हे घडे**
**प्रेम ऐसे ॥१६.५३॥**

यथार्थ ज्ञानाचा उपाय सर्व उपायांमध्ये राजा आहे, असं कृष्णानं सांगितलं. प्रेमाला जाणणं म्हणजे आत्म्याला अनुभवणं. हे अमृत ज्यांना मिळतं, ते संतुष्ट चित्तानं अन् आदरानं त्या ज्ञानावरून आपला जीव ओवाळून टाकतात. आता असं की, ज्या वस्तूवर अथवा व्यक्तीवर आपलं प्रेम जडतं, ती वस्तू किंवा व्यक्ती इतर गोष्टींना मागे सारते. वेळोवेळी मनात पुढे पुढे घुसू लागते, असा प्रकार घडतो. प्रेमाची गोष्टच वेगळी असते. माउली म्हणतात,

**जे रुसता बांधे ठावो ।**
**ते प्रेम गा हे ॥१८.२९४॥**

हा अनुभवामृताचा नशिला प्याला सर्वांच्याच नशिबात नसतो. 'प्रेमाचा पोवाडा' गाणारे गोविन्दाग्रज ऊर्फ रा. ग. गडकरी एकटेच जगत होते. कोल्हटकरांच्या प्रेमपत्रावर प्रेम करत होते. कोल्हटकर त्यांचे गुरू, नाट्यगुरू.

प्रेमाचं सोनं घेऊन कुठल्या बाजारात फिरावं लागत नाही, तर आयुष्यात एक क्षण दुसऱ्याचा येतो, तोच ते सोनं नकळतपणे घेऊन जातो. ती प्रेमाची भूल इतकी वेगवान असते की प्रेमिकाला अंतर्बाह्य बदलून टाकते. व्यष्टीकडून समष्टीकडे जाताना वाट प्रेमाचीच धरावी लागते. त्या वाटेवर प्रेमरसाची चव चाखायला मिळते. 'प्रेम रुचीसी आले' हे सांगण्याची योग्यता लाभते. प्रेमिकांच्या चातुर्याला शहाणपणाचा टिळा लागतो. भावबळाप्रमाणे प्रेमबळ वाढतं. व्यक्तिप्रेमातून विश्वप्रेम निपजतं. विश्वचैतन्याशी एकरूप होऊन मनाला समाधिसुखाची अनुभूती येते. तेव्हा प्रेमिकांचा आडवाटेवरचा जीवनप्रवास महामार्गानं सुरू होतो. 'ज्ञानेश्वरी'त म्हटलंय,-

---

शौर्याचा अतिरेक झाला की त्याला दुर्गुणांचे स्वरूप येते. - ॲडिसन

**जे माझेनि कामे सकाम।**
**जे माझेनि प्रेमे सप्रेम ।।९.३६३।।**

एक झेनगुरू होता. त्याच्याकडे एक तरुण आला. तो म्हणाला, ''मी एक साधक आहे, पण मला मार्गदर्शक नाहीए. साधना कशी करू, सांगाल का? काय करू?''

''तुझ्या जन्माआधी तुझा जो चेहरा होता, तो घेऊन ये.''

''हे कसं शक्य आहे? जन्मापूर्वी चेहरा असतो का?''

''ठीक आहे. तुझ्या मृत्यूनंतरचा चेहरा तरी शोधून काढ अन् तो घेऊन ये!''

''हेही अशक्य आहे!''

''मग तू साधना काय नि कशी करणार?''

झेनगुरूनं उलट प्रश्न केला.

प्रेमीसुद्धा असंच 'अशक्य आहे' म्हणत असतील, तर प्रेम काय नि कसं करणार?

कृष्णाशी ओळख नसताना, पाहिलंही नसताना, केवळ त्याची कीर्ती ऐकून रुक्मिणी त्याच्या प्रेमात पडली होती. त्याला प्रेमपत्र लिहून ते एका प्रेमदूतातर्फे पाठवलं होतं. तो ससैन्य विदर्भात द्वारकेहून आला अन् लग्नाच्या आदल्या दिवशी तिला राजा महाराजांच्या देखत रथात घेऊन तुफान वेगानं निघून गेला... बहुधा जगातलं हे पहिलं प्रेमप्रकरण असावं. तेव्हापासून पळवून नेणं आणि पळून जाणं सुरू झालं असेल!

याउलट आयुर्वेदाचार्य चरकऋषींनी एका राजाकडून त्याची राजकन्या पसंत पडली म्हणून तिच्याशी लग्न करून तिला आपल्या आश्रमात आणलं होतं. ते औषधं तयार करण्यात इतके गढून गेले की, बारा वर्षे जडीबुटींच्या प्रयोगात आपल्या तरुण, सुंदर पत्नीलाही विसरून गेले.

एकदा अंधार झाला, पण दिवा कुणी लावायला विसरले. अनेक विद्यार्थी होते, तेव्हा पत्नी दिवा घेऊन आली. त्या दीपकळीच्या उजेडात तिला पाहून त्यांनी प्रश्न केला, ''तू कोण?''

''मी आपली पत्नी!''

''इतकी वर्षे कुठं होतीस?''

''इथंच आश्रमात आपली सेवा करतेय.''

''अरेरे! मी तुझ्यावर फार मोठा अन्याय केलाय. तुझी अबोल सेवा, मूक भक्ती पाहून मी प्रसन्न झालोय. सांग, काय हवंय तुला?''

''मला पतिसुख हवंय!''

''पण मी तर म्हातारा झालोय.''

''तरुण होण्याचं औषध तुम्ही शोधून काढलंय, त्याचा प्रयोग स्वतःवर करा!''

मूक प्रेमाची अशी शक्ती असते की, चरक केवळ आपल्या पत्नीसाठी तरुण झाले!

अबोल प्रेम कृतीतून बोलतं आणि सेवेचं स्वर्गीय फळ देतं ते असं! आपण भौतिक दारिद्र्याला फार घाबरतो, पण आध्यात्मिक दारिद्र्याची जराही पर्वा करत नाही. 'चमडी जाय, पर दमडी न जाय' हा आपला अट्टाहास. काम, क्रोधांना प्रेमात जिरवता येत नाही. त्यात 'मी' असतो. मी आई, बाप, मी भाऊ, मी बहीण असे असंख्य मी! मी कलावंत, मी राजकारणी, मी कार्यकर्ता, मी अधिकारी... हे अनेक 'मी' त्या असंख्य 'मी' ला मिळाल्यावर अहंकाराची ताकद वाढते. प्रेम हे अहंकाराला आपल्या सागरात बुडवून टाकतं. तरंगसुद्धा उठत नाहीत. प्रेम स्वायत्त असतं. स्वयंभू असतं. ते स्वातंत्र्य देतं. गुलामीतून मुक्त करतं.

आपली आध्यात्मिक दिवाळखोरी जगजाहीर आहेच. त्यात प्रेम म्हटलं की, 'मुडदाच पाडला पाहिजे' ही राक्षसी वृत्ती. दीडदमडीच्या घराण्यालाही प्रेम केलं की कलंक वगैरे लागतो. मुहम्मद जीनांनी शंभर वर्षांपूर्वी प्रेमविवाह केला होता, तो गाजला. कालांतरानं त्याच्या पोरीनं 'प्रेमविवाह करणार' म्हणून प्रसिद्धी मिळवली, तर बापानं तिला आपल्या अफाट मालमत्तेतून बेदखल केलं होतं! आपल्यामध्ये असा बाप लपलेला असेल तर? जीनांच्या मलबार हिलवरील बंगल्याला वारसदार

---

पोकळ वर्ग करणाऱ्या माणसांना जग पोकळच वाटणार. - यंग

नाहीए कुणी! पाकिस्तान म्हणतोय, 'बंगल्यावर आमचा हक्क आहे.'

काय मिळालं त्याला मुलीला घराबाहेर काढून?
त्याचं थडगं कुठाय, ठाऊक आहे कुणाला?

आपण खूप फिरतो. खूप फिरतो. सत्तेभोवती, संपत्तीभोवती, इच्छेभोवती, पदाभोवती... आपली अनेक केंद्रं आहेत. अगणित शाखा आहेत. काही विद्वान, स्वतः भोवतीच फिरतात, ते प्रेमावर व्याख्यानं झोडतात. 'वाहव्वा' मिळवतात, पण स्वतःच्या सुरक्षित परिघाला सोडून ते प्रेम करू शकत नाहीत हे त्यांचं दुर्दैव! खरं तर स्वकेंद्रित होणं म्हणजे स्वरूपदर्शनाचा योग साधणं, परमशांतीचा स्वामी होणं, परंतु 'स्व' म्हटला की स्वार्थ याशिवाय दुसरा अर्थ काढताच येत नाही. दुसऱ्या अध्यायातला 'स्थितप्रज्ञ' आपल्या आयुष्यात चुकून आलाच, तर आपण त्याला अरसिक म्हणून सहजपणे हिणवू शकतो एवढी आपली पात्रता नक्कीच आहे. विषादयोगापासून विश्व चैतन्याकडे जाण्यासाठी प्रेमयोगाचा पूल पार करावा लागतो. त्या पुलावरच 'झालं आयुष्याचं सार्थक' असं म्हणणारेही अनेक जण असतात.

चित्तशुद्धीनं अवघ्या व्यथावेदनांचा निरास करता येतो. विक्षेपशून्य अंतरंगात शुद्धतेचं बी रुजतं. आपण अशांत असतो. शांती शोधत फिरतो. दुप्पट अशांती अनुभवतो. आधी अशांती असते. शांती शोधण्याचा त्रास नंतर आणखी अशांत करतो. 'प्रेम करणं कसं शक्य आहे?' हा प्रश्न विचारणारा बुद्धिमान असो वा अज्ञानी जीव, त्याचं चित्त शुद्ध नाहीए असं खुशाल समजावं. असा पराभव हीनदीन करून टाकतो माणसाला– त्यातून जातपंचायतीची डबकी तयार होतात. प्रेमीजिवांना बहिष्कृत करतात. सत्य शरीरापर्यंत येता येता नासून जातं. तेच आत्म्याला जाऊन मिळालं की 'गीतादर्शन' होतं. अंतःकरण एक 'थांबा' आहे. अखेरचं ठिकाण नाही. तिथून तर खरी अंतर्यात्रा सुरू होते. आतल्या प्रेमाच्या झऱ्यावर कुणी तहानलेला प्रेमीजीव येतो, तेव्हा प्रेमरस आपोआप झरू लागतो. स्रवू लागतो.

'जे माझ्या–विषयीच्या कामनेनंच कामनायुक्त आहेत, जे माझ्याविषयीच्या प्रेमानंच प्रेमयुक्त आहेत' असं नवव्या अध्यायात श्रीकृष्ण सांगतो ते प्रेमिकांसाठी योग्य मार्गदर्शन आहे.

काया–वाचा–मने करून प्रेम करता करता प्रेमी प्रेमरूप होत जातो. मग तो आपल्या प्रिय व्यक्तीवर प्रेम करता करता प्रेमावरच प्रेम करायला लागतो. ही उच्च आत्मिक अवस्था प्रेमिकांना माणुसकी शिकवते. सप्रेम अनुरागाचा हा सद्गुणच असा असतो की, कुणाशीही सुसंवाद साधता येतो. बोलण्यात गोडवा येतो. नेपोलियनच्या सव्वीस हजार पत्रांमध्ये सर्वाधीक पत्रं त्याच्या पत्नीला – जोसेफाईनला लिहिलेली आहेत. तरीही तिला त्याची किंमत नव्हती. हे दुर्दैव तिचं की त्याचं? जी. एं. च्या पत्रसंग्रहाचे तीन खंड आहेत. त्यातील मनमोकळा जिव्हाळा प्रेमाच्याही पैलतीरावर घेऊन जाणारा आहे!

प्रेमळ भक्तांना सहज मिळणाऱ्या भगवंताला ज्ञानेश्वर म्हणतात : प्रेमलप्रांजल! जिथं अवघं चैतन्य देहाच्याच मर्यादेत आणून ठेवता येतं, तिथं अहंकार गळून पडतो.' मी प्रेम करतो हा गर्वही गळून जातो. 'प्रेम अलोट उपजे' या जाणिवेनं आपल्यातल्या उणिवा स्पष्टपणे समोर येतात आणि 'प्रेमा अढळ कीजे' ही आज्ञा शिरसावंद्य मानून आपण प्रेमनिष्ठ होणं आवश्यक असतं. प्रेमनिष्ठ झाल्यावर एक वळण असंही येतं की, तिथं स्त्रीपुरुष हा भेद वाटेनासा होतो. 'अवघा रंग एक जाला! रंगी रंगला श्रीरंग।।' ही सोयराबाईंची आत्मानुभूती आपलीच असल्याची आत्मप्रतीती येते. ती येण्यासाठी 'प्रेम रुळतसे बोलता' एवढं मात्र मनावर कायमचं कोरून ठेवायला हवंय. सोबतीला 'ज्ञानेश्वरी' मात्र हवीच!

**– अरविन्द दोडे**
भ्रमणध्वनी : ९८१९१९५५९२

●●●

शहाण्या लोकांना या जगात निरुपयोगी असे काहीच आढळत नाही. – ला फाँटेने

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

• सन २०१६-१७ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल ५०% लागला.

• लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली. तसेच इ. ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. विषय खालीलप्रमाणे होते.

इ. ५वी, ६वी - लोकमान्य टिळकांचे बालपण

इ. ७ वी, ८ वी - लोकमान्य टिळकांचे सामाजिक व राजकीय कार्य

इ.९ वी, १० वी - १) पाठ्यपुस्तकातून मला भेटलेले टिळक

२) टिळकांचे गीतारहस्य

• स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून यंदाही हस्तलिखित व भित्तीपत्रिकांचे प्रकाशन करण्यात आले होते. हस्तलिखितासाठी विषय देण्यात आला होता 'स्वच्छता'.

**भित्तीपत्रिका**

मराठी - आविष्कार - मधुकर तोरडमल

हिंदी - नवनीत - संत कबीर

विज्ञान - कर्करोग

• भारत विकास परिषद व वामनराव रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर घेण्यात आले. आपल्या शाळेतील सौ. साधना जोशी, सौ. संध्या झंझाड, सौ. सुवर्णा चव्हाण यांनी रक्तदान केले.

• पर्यावरण दक्षता मंच पर्यावरण स्नेही गणपती जनजागृती अभियानांतर्गत शाळेत शाडूच्या मातीपासून गणपती तयार करण्याची कार्यशाळा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत सहभाग घेतला.

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**एप्रिल-२०१७ च्या बालवीर राज्य पुरस्काराचा निकाल :**

राज्य पुरस्कार मिळालेल्या बालवीरांची नावे खालील प्रमाणे :

१) कु. यश कारेकर

२) कु. यश चाबुकस्वार

३) कु. मानस कुलकर्णी

४) कु. ओंकर राऊत

५) कु. हितुल छडवा

**प्रारंभ कला अकॅडमी आयोजित नाट्यछटा स्पर्धेचा निकाल :**

१) कु. कृपा झुंझाजराव - प्रथम क्रमांक

२) कु. यशश्री दाभोळकर - तृतीय क्रमांक

**Indian Institute for Studies in Mathematics आयोजित गणित प्रावीण्य शोध परीक्षेचा निकाल :**

यशस्वी विद्यार्थ्यांची यादी :

| इ. | विद्यार्थ्यांची नावे | क्रमांक |
|---|---|---|
| ५ वी | गौरांगी पाटील | ५० वा |
| ५ वी | सार्थक कुलकर्णी | ५३ वा |
| ५ वी | हर्ष ठाकूर | ६८ वा |
| ७ वी | मिहीर राऊत | १५७ वा |
| ८ वी | केतकी धर्माधिकारी | ५४ वा |
| ८ वी | शुभम करमपुरे | १०५ वा |

एकच वस्तू उपयुक्त आणि निरुपयोगी असू शकत नाही. - सिसेरो

| | | |
|---|---|---|
| ८ वी | अजिंक्य जोशी | १२९ वा |
| ८ वी | तनया पंगारेकर | १७३ वा |

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी-बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालयात दि. २० जून २०१७ रोजी वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमालेचं ८ वे पुष्प ख्यातनाम तत्त्वज्ञ व मुंबई विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विभागाच्या भूतपूर्व प्रमुख डॉ. शुभदा जोशी यांनी गुंफलं. 'कौटिलीय अर्थशास्त्र - शिक्षकांची नायक म्हणून भूमिका' या विषयावर त्यांनी व्याख्यान दिलं. कौटिलीय अर्थशास्त्राच्या परीक्षांत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण जडणघडणीत शिक्षक एक महत्त्वाची भूमिका बजावू शकतात असं त्या म्हणाल्या. 'विद्यासमुद्देश' या कौटिलीय अर्थशास्त्रातील अत्यंत महत्त्वाच्या संकल्पनेवर त्यांनी भर दिला. कौटिल्याने अंतिम उद्दीष्ट हे 'पृथिव्या लाभे पालने च।' असं सांगितलं असून त्यात अध्यापक व विद्यार्थी यांची महत्त्वाची जबाबदारी आहे. शिक्षकाचं विद्यार्थ्यांप्रति कर्तव्य काय असलं पाहिजे यावर प्रकाश टाकताना डॉ. जोशी म्हणाल्या की, शिक्षक 'आध्यक्षिक', 'तार्किक' व 'शाब्दीक' या आन्विक्षिकी मधील भूमिका घेऊ शकतो. अध्ययन व अध्यापन या दोन्ही महत्त्वाच्या गोष्टी असून त्यातूनच पुढील पिढी घडत असते व येथेच शिक्षकाला 'नायक' म्हणून भूमिका वठवावी लागते असं त्या म्हणाल्या. कार्यक्रमाला विद्या प्रसारक मंडळाचे सहसचिव श्री. कयाळ उपस्थित होते. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी देखील आपलं मनोगत व्यक्त केलं. या कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण इंटरनेटद्वारे करण्यात आलं. विद्या प्रसारक मंडळाच्या यूट्यूब चॅनलवर ही व्याख्यानमाला उपलब्ध आहे.

महाविद्यालयाच्या तत्त्वज्ञान विभागातर्फे १ जुलै २०१७ रोजी 'Twelve Angry Men' हा चित्रपट दाखवण्यात आला. या चित्रपटातील महत्त्वाच्या विषयांवर नंतर विद्यार्थी व प्राध्यापकांनी चर्चा केली.

जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाने दि. १९ जुलै २०१७ या दिवशी 'शरलॉक होम्स् ते व्योमकेश बक्षी' या लोकप्रिय डिटेक्टीव पात्रांवर आधारित कार्यक्रमाचे आयोजन केले होते. द्वितीय वर्ष इंग्रजी साहित्याच्या अभ्यासक्रमात प्रसिद्ध बंगाली लेखक सरबिंदू बंदोपाध्याय यांच्या 'साही का कांटा' (इंग्रजी भाषांतर-Quills of the Porcupine) या कथेचा समावेश करण्यात आलेला आहे. या कथेवरील आधारित दूरदर्शन मालिकेच्या एका भागाच्या प्रदर्शनाच्या निमित्ताने 'डिटेक्टीव' कथा या गेल्या शतकभरातील सर्वात लोकप्रिय वाङ्मय प्रकाराच्या सामाजिक संदर्भाची यावेळी चर्चा करण्यात आली.

विभागप्रमुख प्रा. प्रमोद खराटे यांनी प्रास्ताविक करून या कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. प्रा. मनोज पाथरकर यांनी इंग्रजी वाङ्मयातील लोकप्रिय डिटेक्टीव पात्रांचा परिचय एका सादरीकरणाद्वारे करून दिला. यात एडगर ॲलन पो च्या ड्युपाँपासून कॉनन डॉयलच्या शरलॉक होम्सपर्यंत आणि ॲगाथ ख्रिस्ती यांच्या पॉयरॉ व मिस् मार्पलपासून फ्रेंच लेखक सिमेनॉन यांच्या मेग्रेपर्यंत सर्व पात्रांची ओळख करून देण्यात आली. या संदर्भातील चर्चेत डिटेक्टीव कथा महानगरातील जीवनाशी निगडित अनेक विरोधाभासांना कसा स्पर्श करतात आणि आधुनिक खासगी व्यावसायिक (Professional) ही संकल्पना कशी अधोरेखित करतात हे स्पष्ट करण्यात आले. माणसाला गोंधळून टाकणाऱ्या आधुनिक जगात 'डिटेक्टीव' हा मानवाच्या समजून घेण्याच्या क्षमतेचे दर्शन घडवतो आणि त्याचवेळी त्याला आत्मविश्वास देतो असे दिसून येते.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून इंग्रजी विभागाच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

दि. २० जुलै २०१७ रोजी 'Relevance of Philosophy' या विषयावर महाविद्यालयाच्या माजी प्राचार्या डॉ. शकुंतला सिंग यांनी व्याख्यान दिले. तत्त्वज्ञान विषयाचे सद्यकालीन महत्त्व व समयोचितता या विषयावर डॉ. सिंग यांनी प्रकाश टाकला.



दि. २० जुलै २०१७ रोजी 'Overview of GST' या विषयावर व्यासपीठ संपन्न झाली. माहविद्यालयातील वाणिज्य विभागातील प्राध्यापक श्री. योगेश प्रसादे यांनी व्याख्यान दिले. जी.एस.टी. या सरकारच्या महत्त्वाकांक्षी करसुधारणा विधेयकावर त्यांनी प्रकाश टाकला. सर्व प्राध्यापकांच्या प्रश्नोत्तराच्या सत्राने कार्यक्रम संपन्न झाला.

कै. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमालेचं ९ वे पुष्प दि. २१ जुलै २०१७ रोजी प्राच्यविद्येच्या जाणकार व पुरातत्त्व शास्त्राच्या अभ्यासिका सौ. अनिता आगाशे यांनी गुंफलं. 'लिंबगाव येथील उत्खनन' या विषयावर त्यांनी व्याख्यान दिलं. संस्कृतचे अभ्यासक व डेक्कन कॉलेज येथील भूतपूर्व संस्कृताध्यापक श्री. प्रभाकर आपटे हे देखील कार्यक्रमाला उपस्थित होते.



साताऱ्यापासून १४ कि.मी. अंतरावरी 'लिंबगाव' नावाच्या एका खेड्यात उत्खनन करताना एक मोठा कालपट उभा राहिला व तेथून पुरातत्त्व संशोधनाला एक नवी दिशा मिळाली असं सौ. आगाशे म्हणाल्या. 'वीरगळ', '१५ मोटांची विहीर', 'प्राचीन शिलालेख' इत्यादींचा अभ्यास करून लिंबगावचा इतिहास इसवी इसनाच्या चौथ्या शतकापर्यंत नेता येतो व त्यातून पेशवेकालीन इतिहासाची एक नवी ओळख होते असं त्या म्हणाल्या. या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना संशोधन प्रवृत्तीची जोपासना करण्याची गरज व्यक्त केली.

व्याख्यानमालांना विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि. २६ जुलै रोजी राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे 'कारगील विजय' साजरा करण्यात आला. 'जम्मूकाश्मीर अध्ययन केंद्र व स्वदेशी जागरण मंच' यांचाही या कार्यक्रमात सहभाग होता. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांसह अनेक विद्यार्थी व प्राध्यापकांनी कार्यक्रमाचा लाभ घेतला. सैनिकांनी पाकिस्तानशी लढताना प्राण्यांची बाजी लावून देशाचे संरक्षण केल्याची देशभक्तीची जाणीव सर्व विद्यार्थ्यांना झाली व त्यांनी सैनिकांच्या बलिदानाला नमन केले.

दि.२९ जुलै २०१७ रोजी प्रा. छाया कोरे यांचे 'भगवद्गीता' या विषयावर व्याख्यान झाले. तत्त्वज्ञान

विभागातील विद्यार्थी व प्राध्यापक या कार्यक्रमास उपस्थित होते.

जोशी-बेडेकर कॉलेज फिल्म सोसायटी तर्फे दि. ३१ जुलै रोजी मुरशिल इस्लाम दिग्दर्शित 'One Day in Anil Bagachir Life' हा बांगलादेशी चित्रपट दाखविण्यात आला. १९७१ सालच्या बांगलादेश व पाकिस्तानच्या फाळणी संदर्भातील हा चित्रपट बीएमबीएम व अन्य विद्याशास्त्रांच्या विद्यार्थ्यांना पर्वणी ठरला. महाविद्यालयाच्या फिल्म सोसायटीच्या या कार्यक्रमास प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक या आवर्जून उपस्थित होत्या. डॉ. नाईकांनी प्रास्ताविकामध्ये महादेवाचा तिसरा डोळा व आधुनिक युगातील कॅमेरा यांची तुलना करत चित्रपटक्षेत्रात उपलब्ध असलेल्या अनेक संधी अधोरेखित केल्या. चित्रपटानंतर विद्यार्थ्यांनी बांगलादेशाच्या तत्कालीन परिस्थितीचे चित्रण यावर चर्चा केली.

दि. ५ ऑगस्ट रोजी महाविद्यालयाच्या 'स्टाफ ॲकॅडमी' तर्फे प्रसिद्ध कथ्थक नृत्यांगना श्रीमती झेलम परांजपे यांनी संकल्पना केलेला 'मी सावित्री' नावाचा नृत्याविष्कार सादर झाला. सावित्रीबाई फुले यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक कंगोरे या नृत्याविष्कारातून पुढे आले. सावित्रीबाईंनी महात्मा फुले यांना लिहिलेल्या तीन पत्रांवर आधारित हा नाट्यप्रयोग आहे. या कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सौ. सुचित्रा नाईक उपस्थित होत्या. प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



महाविद्यालयातर्फे जानेवारी २०१८ मध्ये होऊ घातलेल्या 'Smart Cities: The Road Ahead' या परिसंवादाचा एक भाग म्हणून दि. १२ ऑगस्ट २०१७ रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेस दाराशॉ प्रा. लि.चे उपाध्यक्ष श्री. आनंद मेनन व एसआयइएस महाविद्यालय, सायनच्या प्राचार्या डॉ. किन्नरी ठक्कर उपस्थित होत्या. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी कार्यशाळेत चर्चिल्या जाणाऱ्या काही महत्त्वाच्या गोष्टींवर प्रकाश टाकला.

श्री. आनंद मेनन यांनी 'Best Practices for Smart Cities Transformation' या विषयावर सादरीकरण केले. प्रगत शहरांच्या विकासासाठी शहराचा सर्वांगीण विकास अत्यंत महत्त्वाचा असून सर्वांनी त्यात आपला वाटा दिला पाहिजे असे ते म्हणाले.

दुसऱ्या सत्रात डॉ. किन्नरी ठक्कर यांनी 'How to write Quality Research Paper' या विषयावर मार्गदर्शन केले.

परिसंवाद, कार्यशाळा व चर्चासत्रांमध्ये अत्यावश्यक असलेल्या शोधनिबंधाचे लेखन प्रभावीपणे कसे करावे यावर डॉ. ठक्कर यांनी प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. निलम शेख यांनी केले.



या कार्यशाळेस प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

**विद्यार्थ्यांचे नेपाळ येथे आंतरराष्ट्रीय परिषदेतील यश**

तृतीय वर्ष जैवरसायनशास्त्र विभागातील कु. कनद घैसास व कु. सिध्येश थोरात या दोन विद्यार्थ्यांनी नुकत्याच काठमांडू नेपाळ येथे पार पडलेल्या 1st Global Science Congress on Emerging Trends in Basic & Applied Science 2017 (ETBAS 2017) या आंतरराष्ट्रीय परिषदेत "Synthesis of Natural Dye Nanoparticles and its Analysis" या विषयावर आपला शोधनिबंध सादर केला. त्यांच्या या संशोधनात प्रा. रूचा खडके, प्रा. रती शर्मा व डॉ. अनिता गोस्वामी गिरी या प्राध्यापकांनी त्यांना मार्गदर्शन केले. तसेच त्या या दोन विद्यार्थ्यांबरोबर या परिषदेला नेपाळ येथे उपस्थित होत्या.

नैसर्गिक डायपासून अतिसूक्ष्म कणांचा थर (nanoparticle Layer) तयार करून या थराचा वापर अन्न, औषधे व प्रसाधनांमध्ये केल्यामुळे फार दुष्परिणाम होत नाहीत. तसेच पर्यावरणाच्या दृष्टीने देखील हे संशोधन उपयुक्त ठरू शकेल. विद्यार्थी व शिक्षक गेले ७ महिने या विषयावर संशोधन करीत होते.

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय गेली ४० वर्ष विज्ञान विषयातून ज्ञानार्जन करित आहे. मुलांमध्ये संशोधन वृत्ती निर्माण होण्यासाठी तसेच त्याचा वापर वाढण्यासाठी महाविद्यालय अनेक उपक्रम जसे मिनी रिसर्च प्रोजेक्ट, जर्नल क्लब, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन, महाविद्यालयाचे स्वतंत्र नियतकालिक इ. राबवीत आहे.

सर्व शिक्षक व विद्यार्थी संशोधनामध्ये राज्य व राष्ट्रीय पातळीवर आपले काम सिद्ध करत आहेत. पण गेल्या दोन वर्षांपासून महाविद्यालयाचे विद्यार्थी आंतरराष्ट्रीय पातळीवर सहभाग घेऊन यश देखील संपादन करत आहेत. ही महाविद्यालयासाठी गौरवाची बाब आहे.

लहान वयात या प्रकारचा सहभाग ही संशोधन क्षेत्रात महाविद्यालयाने घेतलेल्या परिश्रमाची पावती आहे.

**''अनुबंध, एन. एस. एस. व एन. सी. सी. युनिटच्या महारक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद''**

'अनुबंध' या माजी विद्यार्थी मंडळाच्या सहकार्याने व राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना आणि लायन्स क्लब ऑफ कांजुरमार्ग यांच्या संयुक्त विद्यमाने कारगील विजय दिवसानिमित्त आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरास संपूर्ण महाविद्यालयीन कॅम्पस मधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या रक्तदान शिबिराचे औपचारिक उद्घाटन प्रसिद्ध अभिनेता श्री. उदय सबनीस यांनी केले.'' आपल्या रक्तगटाद्वारे ज्याप्रमाणे आपण शुद्ध रक्त गरजू व्यक्तिला देतो त्याबरोबर आपले व्यक्ती म्हणून काही गुणदोषही एकप्रकारे आपण संक्रमित करीत असतो. तर मुळात आपणच एक सभ्य नागरिक, आदर्श असा माणूस म्हणून जर स्वतःला घडवीत गेलो तर आपल्यातील गुणही आपल्या रक्ताबरोबर त्या रुग्णाला प्राप्त होतील व सुदृढ शरीरासारखेच सुदृढ मनही आपण तयार करून एकप्रकारे राष्ट्रउभारणीसाठी हातभार लावीत असतो. असा एक वेगळा विचार यावेळी उदघाटनपर भाषणात बोलताना श्री. उदय सबनीस यांनी मांडला.

अनुबंधचे श्री. अभय मराठे, प्रिया मराठे हे बांदोडकरचे माजी विद्यार्थी यांनी पुढाकार घेऊन 'अनुबंध' च्या माध्यमातून सर्व विद्यार्थी वर्गाला एकत्रित आणून यामध्ये एन. एस. एस. व एन. सी. सी. च्या विद्यार्थ्यांचा समावेश होता.

ठाण्याच्या घंटाळीस्थित कै. ओक रक्तपेढीचे पी. आर. ओ. श्री. बेलवलकर यावेळी उपस्थित होते. रक्तदान शिबिराचे उदघाटन करताना प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनी महाविद्यालयामध्ये दरवर्षी दोनदा हे शिबिर आयोजित करण्यात येते असे सांगितले. यावेळी एन. एस. एस. व एन. सी. सी. च्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. ९ ते ४ यावेळेत आयोजित केलेल्या या शिबिरात एकूण ७८ बाटल्यांचे रक्त संकलित करण्यात आले. या शिबिराच्या नियोजनात एन. एस. एस. व एन. सी. सी. बरोबर लायन्स क्लब ऑफ कांजुरमार्ग चे प्रा. पी. एन. सिंग यांनीही महत्त्वाची भूमिका निभावली.

दिवसभर चालू असलेल्या या शिबिरात ज्यांनी रक्तदान करण्याची इच्छा दर्शविली परंतु हिमोग्लोबिन कमतरतेमुळे जे करू शकले नाहीत त्यांची यादी बनवून पुढच्याच महिन्यात ''आहारातून हिमोग्लोबिन कसे वाढविता येईल'' याची खबरदारी घेण्यात येणार आहे. अशी ग्वाही श्री. अभय मराठे व प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनी दिली.

**'नवीन मतदार नोंदणीसाठी महाविद्यालयाची विशेष मोहीम'**

जिल्हाधिकारी कार्यालय व ठाणे निवडणूक अधिकारी १४८ मतदारसंघ यांच्या संयुक्त विद्यमाने व बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या सहकार्याने नवीन मतदार नोंदणीसाठी एका विशेष मोहिमेला सुरुवात झाली. भारत ही एक मोठी लोकशाही आहे व त्या लोकशाहीसाठी मतदाता हा एक महत्त्वाची जबाबदारी पार पाडणारा घटक. हा मतदार जागृत होण्यासाठी एक जागरूकता अभियान राबविण्यात आले.

यामध्ये ठाण्यामधील राहणारे व ज्यांचा वयोगट १८ ते २१ या दरम्यानचा आहे अशा तरुणांना PPT व Documentary द्वारे प्रबोधित करण्यात आले. यामध्ये जे विद्यार्थी नवीन निवडणूक ओळखपत्रासाठी पात्र असतील त्यांना फॉर्म नं. ६ भरून ओळखपत्र मिळण्याची व्यवस्था केली आहे. तसेच रीतसर कार्यक्रम पतंजली सभागृहात पार पडला व या कार्यक्रमाची आखणी नायब तहसीलदार जाधव यांनी केली. त्यामुळे बांदोडकार विज्ञान महाविद्यालयाने मतदार नोंदणी कार्यक्रमात सिंहाचा वाटा उचलला आहे.

**NCC च्या पहिल्याच Combine Annual Training Camp मध्ये बांदोडकरच्या NCC Unit ला चार सन्मान**

I M AH.B.NCC मुंबईच्या वतीने खडवली येथील सैनिकी विद्यालयात दहा दिवसीय निवासी शिबिरात (CATC) विविध स्पर्धामध्ये बांदोडकर महाविद्यालयाच्या NCC Army Boys Unit ला चार मानांकने प्राप्त झाली. (Best Drill), सर्वोकृष्ट परेड, (Best Skit), सर्वोकृष्ट नारिका, (Best Fiving), सर्वोकृष्ट नेमबाज व (Camp senior) शिबिर कॅप्टन अशा चार स्पर्धांमध्ये ही बक्षीसे NCC Cadets नी मिळविली. कॅडेट नीळकंठ, (Best Drill), कॅडेट प्रसन्न रावते, (Best Skit) व सिनिअर अंडर ऑफिसर अक्षय आमरे याने नेमबाजीमध्ये व Best Camp senior म्हणून बाजी मारली.

महाविद्यालयाच्या प्राचार्या. डॉ. माधुरी पेजावर यांनी सर्व विजयी कॅडेटना शुभेच्छा देऊन अभिनंदन केले. या शिबिराचे Adjutant म्हणून उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल सैनिकी विद्यालयाचे प्राचार्या तोटवणे यांनी संस्थेचे सन्मानचिन्ह देऊन लेफ्टनंट बिपीन धुमाळे यांचा सत्कार केला. यावेळी शिबिराच्या शेवटी सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. प्रकाश माळी यांना I MAHBN चे कमांडींग ऑफिसर कर्नल कोंडल यांनी विशेष निर्मंत्रित केले होते.

**Green Earth : A Panoramic View परिषद पूर्व कार्यशाळा १० जुलै २०१७**

महाविद्यालयातर्फे गेली १५ वर्षे राष्ट्रीय परिषदांचे

आयोजन करण्यात येत आहे. तसेच मागील दोन वर्षांपासून दरवर्षी आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते. यावर्षी देखील बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे, बिरबल सहानी इन्स्टिट्यूट ऑफ पॅलिओसायन्सेस, लखनौ आणि बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने ''Green Earth : A Panoramic View'' या विषयावर १२ व १३ जानेवारी २०१८ रोजी आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेच्या पूर्व तयारीचा भाग म्हणून परिषदपूर्व दोन कार्यशाळा आयोजित केल्या आहेत. या कार्यशाळेमध्ये परिषदेत होणाऱ्या विषयांसंदर्भात तज्ज्ञ संशोधकांची व्याख्याने आयोजित केली जातात. जेणेकरून विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय परिषदेत चर्चिल्या जाणाऱ्या विषयांसंदर्भात थोडी कल्पना येते व हे विद्यार्थी परिषदेत आपले शोधनिबंध सादर करू शकतात. दि. १० जुलै २०१७ रोजी ''Green Earth : A Panoramic View'' ही आंतरराष्ट्रीय परिषद पूर्व कार्यशाळा महाविद्यालयाच्या पतंजली सभागृहात दुपारी २.३० वाजता आयोजित करण्यात आली होती. यावेळी डॉ. कृष्णा अय्यर, प्राध्यापक, बॉम्बे कॉलेज ऑफ फार्मसी यांचे "Metabolism Mediated Phyloremidiation : An introduction to the concept & possibilities" या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. तसेच डॉ. पुष्पा मिश्रा, पोस्ट डॉक्टरल फेलो, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ, मेरीलँड यांनी "Biophysics : a route to serve mankind" या विषयावर मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनी "Australia from Birds Eye view" या विषयावर संवाद साधला. ही कार्यशाळा सर्वांसाठी खुली होती. त्याकरिता सर्वांनी याचा लाभ घेतला. याबाबत अधिक माहिती महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर www.vpmthane.org उपलब्ध होती.

**मा. वसंतराव नाईक यांची जयंती साजरी**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. वसंतराव नाईक यांची १०४ वी जयंती साजरी करण्यात आली. 'हरित क्रांतीचे प्रणेते व भूदान चळवळीशी संबधीत. तसेच कृषीक्षेत्राविषयी जिव्हाळा असणारा प्रगतशील मराठी राजकारणी अशी त्यांची ओळख होती व त्यामुळेच ते दुसऱ्यांदा निवडून आले व आज वृक्षलागवडीच्या सप्ताहात आपण त्यांची जयंती साजरी करीत आहोत.' अशा शब्दांत महाविद्यालयाच्या प्राचार्या व हरियाली या सामाजिक व पर्यावरण संघटनेच्या उपाध्यक्षा डॉ. माधुरी पेजावर यांनी मा. वसंतराव नाईकांच्या कार्याचा उल्लेख केला व त्यांच्या कारकीर्दीचा आढावा घेतला. वसंतराव नाईकांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कर्तृत्वाचा आढावा घेतला. तसेच शिक्षक व शिक्षकेतर सहकारी यांचाही सहभाग होता.

**अण्णाभाऊ साठे जयंती तसेच लोकमान्य टिळक पुण्यतिथी उत्साहात साजरी**

दि. १ ऑगस्ट २०१७ रोजी अण्णाभाऊ साठे जयंती तसेच लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त महाविद्यालयाच्या ग्रंथालयात अण्णाभाऊ साठे तसेच लोकमान्य टिळक यांच्या माहितीचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

तसेच अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस उपप्राचार्य डॉ. व्यंकट रमण यांनी पुष्पहार अर्पण केला.

महाविद्यालयाच्या ग्रंथपाल सौ. कादंबरी मांजरेकर यांनी अण्णा भाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या कार्याबद्दल थोडक्यात माहिती सांगितली.

ग्रंथालय व कार्यालयीन कर्मचारी तसेच शिक्षक व शिक्षकेतर सहकारी आणि विद्यार्थी यांनी अण्णाभाऊ साठे तसेच लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पे अर्पण केली.

समजूतदारपणाच्या बागेत मैत्रीची फुले फुलत असतात. - डब्ल्यू. विल्सन

**'महाविद्यालयात संयुक्तपणे वृक्षलागवड'**

वनस्पतीशास्त्र विभागाच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, सांस्कृतिक विभाग व जागर जाणिवांच्या अभियानांतर्गत एका भव्य वृक्षलागवडीचे आयोजन केले गेले. यावेळी महाविद्यालयीन परिसरात एका भव्य मिरवणुकीचे आयोजन एन. सी. सी आर्मी बॉइज अॅड गर्ल्स तसेच एन. सी. सी. नेव्ही बॉइज अॅड गर्ल्स या कॅडेटसनी केले. यामध्ये महाविद्यालयाचा NSS विभागही सहभागी होता. वनस्पतीशास्त्र विभागाने दोन महिने अगोदरच महाविद्यालयीन परिसरात कोणती वृक्षलागवड होऊ शकते? कोणत्या वृक्षांची जास्त गरज आहे? खाडी परिसरात कोणती झाडे जगू शकतात? भूस्खलन (Erosion) थांबविणारी व जास्त Oxygen देणारी झाडे कोणती? या सर्वांचा अभ्यास करून विभागप्रमुख डॉ. मैत्रेयी सहा व डॉ. विनोद जमदाडे यांनी १०० रोपांची निवड केली. NSS व NCC स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात पूर्वीपासूनच असणाऱ्या Bio Compost Bin मध्ये झाडांचा पालापाचोळा गोळा करून त्याचे खत वापरून या १०० निवडक वृक्षांचे रोपण कॉलेज परिसरात केले.

या भव्य वृक्षलागवडीचे औपचारिक उदघाटन महाविद्यालयाच्या प्राचार्या व 'हरियाली' या पर्यावरणीय संघटनेच्या 'उपाध्यक्षा' डॉ. माधुरी पेजावर यांनी केले. 'चंदन, आपटे, सप्तपर्जी, चिंच इ. वनझाडे ही आपणास जास्तीत जास्त ऑक्सिजन प्रदान करतात. तसेच या झाडांचा औषधी उपचार पद्धतीतही मोठ्या प्रमाणावर उपयोग होतो. तसेच Sand Snider या प्रकारात मोडणारी काही वृक्षे जमिनीला म्हणजेच मातीला धरून ठेवतात. त्यामुळे भूस्खलन होत नाही व पर्यायाने पर्यावरणाचे संरक्षण होते. तसेच दोन्ही झाडे महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थी दत्तक घेणार असून वर्षभर त्याची देखभाल व काळजी घेणे ही त्याची जबाबदारी असेल' असे मत यावेळी प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनी व्यक्त केले. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. मधू नायर, NSS चे प्रा. मांडलेकर, शिक्षक व शिक्षकेतर सहकारी उपस्थित होते. प्रत्येक विद्यार्थ्याच्या वाढदिवशी त्याने झाड लावून वर्षभर त्याची जबाबदारी स्वतःवर घ्यायचा संकल्प सर्व विद्यार्थ्यांनी केला. त्यामुळे महाराष्ट्राचे ४ कोटी वृक्ष लागवडीचे लक्ष्य लवकरच पूर्ण केले जाईल अशी इच्छा सर्वांकडून यावेळी व्यक्त करण्यात आली.

**NCC चे (CATC) शिबिर – एक अविस्मरणीय अनुभव**

वर्षारंभाच्या सुरवातीलाच Combing Animal Training Camp (CATC) ची घोषणा झाली व खडवलीच्या सैनिकी स्कूल मध्ये १० दिवस कॅम्प घ्यायचे निश्चित झाले. मुंबई व ठाणे विभागातून व I MAHBN Mumbai NCC बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल कोंडल यांनीही नवीनच सूत्रे हाती घेतली होती आणि संपूर्ण युनिटमधून ४९८ कॅडेटस सहभागी झाले होते. या दहा दिवसांमध्ये फायटींग Quarter Guard चे प्रशिक्षण, परेड, Drill Competition, सांस्कृतिक कार्यक्रम, खेळांच्या स्पर्धा या सर्वाची व्यवस्थित बांधणी करून बटालियनचा सर्व PI Staff कार्यरत होता. ठाण्याच्या विद्या प्रसारक मंडळाच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे NCC ARMY BOYS युनिट मधून १५ कॅडेटस या शिबिरामध्ये सहभागी झाले होते. शिबिराचे Adjutant म्हणून NCC ANO. लेफ्टनंट बिपीन धुमाळे यांची नियुक्ती झाली. संपूण वर्षभराचे वेळापत्रक, सर्वात Best कोण? विविध स्पर्धांमध्ये, विविध महाविद्यालयातील कॅडेट मध्ये सर्वोत्कृष्ट कोण? याची चाचणी, या सर्वांची जबाबदारी घेणे, निवड करणे पुढील Republic day साठी कॅडेटना प्रोसाहन देऊन तयार करणे ही सर्व या कॅम्पमध्ये तयारी करून घेतली जाते.

बांदोडकरच्या Unit च्या कॅडेटना या शिबिरामध्ये

(Best Drill), सर्वोकृष्ट परेड, (Best Skit) सर्वोकृष्ट नारिका, (Best Fiving), सर्वोकृष्ट नेमबाज व Best Camp senior शिबिर कॅप्टन या स्पर्धांमध्ये चार सन्मान मिळाले. एकंदरीत या १० दिवसांमध्ये कॅडेट आणि इतरांनाही खूप काही शिकविणारा कालावधी ठरला आणि अनुभवाच्या दृष्टीनेही खूप काही शिकवून देणारा ठरला. सैनिकी शाळेची शिस्त आणि तत्त्वे मध्येच कमांडिंग ऑफिसर कर्नल कोडांल सरांचे लेक्चर अशा विविध अनुभवांनी समृद्ध असणारा हा दहा दिवसीय कॅम्प सर्वांनाच स्मरणात राहणारा ठरेल.

**''वृक्षांना व परिवहन सहकाऱ्यांना राखी बांधून बांदोडकरने केली राखीपौर्णिमा साजरी''**

सांस्कृतिक विभाग, राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या तर्फे राखी पौर्णिमेनिमित्त आगळ्या वेगळ्या रक्षाबंधनाचे आयोजन केले होते. वृक्ष हे आपल्याला अखंडपणे जीवनभर प्राणवायू देत असतात. वृक्षांमुळेच सर्व जीवनचक्र सुरू आहे. त्याची बांधीलकी व ऋणानुबंध जपण्यासाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील सर्व वृक्षांना उदंड आयुष्य लाभू दे अशी मनोकामना व्यक्त केली.

त्याचप्रमाणे बांदोडकर महाविद्यालयातील विद्यार्थी हे आसपासच्या परिसरातील आहेत व रोजच ते ठाणे परिवहन मंडळाच्या व सिडकोच्या बसेसमधून ये जा करीत असतात व अनेकदा त्यांचा बस वाहक व बस चालक यांच्याशी संपर्क येतो. त्यामुळे आपल्याला सुरक्षित प्रवास करणारे सहकाऱ्यांनाही सुरक्षित आयुष्याच्या शुभेच्छांसह मुला-मुलींनी या सहकाऱ्यांना राख्या बांधून आजची राखीपौर्णिमा साजरी केली.

यावेळी प्रा. प्रकाश माळी, प्रा. भालचंद्र मांडलेकर प्रा. अनिल आठवले व बिपीन धुमाळे इत्यादी शिक्षक व विद्यार्थी हजर होते.

**''बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना व सांस्कृतिक विभागातर्फे सरहद्दीवरील जवानांकरिता राखी व शुभेच्छापत्रांची अनोखी भेट''**

विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या नेव्हल, आर्मी गर्ल्स व बॉईज युनिट आणि बांदोडकर महाविद्यालयाच्या आर्मी बॉईज व सांस्कृतिक विभागाकडून एक भव्य राखी तयार करण्यात आली व त्या राखीवर विद्यार्थी व शिक्षकांनी आपले शुभेच्छा संदेश सरहद्दीवरील जवानांकरिता पाठविले व सर्व महाविद्यालयातून विद्यार्थ्यांनी आपल्याकडून राख्यांचे संकलन करून कॅडेट श्रीकांत रमाणे हा अरुणाचल प्रदेश सरहद्दीवर जाऊन प्रत्यक्ष त्या जवानांना पत्र व राख्या पोहोचविणार आहे.

नेव्हलचे लेफ्ट. डॉ. दीपक साबळे, आर्मी गर्ल्स च्या प्रा. जोशी व आर्मी बॉईजचे लेफ्ट. बिपीन धुमाळे, प्रा. प्रकाश माळी व प्रा. विनोद थोरात यांनी या मोठ्या आयोजनाची जबाबदारी सांभाळली. जोशी बेडेकरच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनीही या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. हिंदूस्थान टाईम्स, सागर टाईम्स इ. पत्रकार यावेळी उपस्थित होते.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आपले कौशल्य वापरून या राख्या व पोस्टकार्ड लिहून तयार करून आपापला खारीचा वाटा उचलला.

प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनी या स्तुत्य उपक्रमास शुभेच्छा दिल्या व या राख्या व पत्रे जवानांपर्यंत पोहोचविण्याची ग्वाही विद्यार्थी व शिक्षकांकडून घेतली. या वेळेस लडाखच्या सिमेवर असलेल्या सैनिकी छावणीबाहेर लिहिलेला संदेशही त्यांनी सांगितला तो असा 'When you go back please tell them that we have spent our present for their future'

राष्ट्रीय छात्र सेना गीताने या उपक्रमाची सांगता झाली.

---

पदवीमुळे तुमच्या कानाची लांबी कमी होत नसते, फक्त ती लपविली जाते. - एच. हवर्ड

**डॉ. सौ. माधुरी पेजावर आंतरराष्ट्रीय जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित**

प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर यांना नेपाळ येथे नुकत्याच पार पडलेल्या ग्लोबल कॉंग्रेस परिषदेत विज्ञान क्षेत्रातील केलेल्या भरीव कामगिरीबद्दल आंतरराष्ट्रीय जीवनगौरव पुरस्काराने ("Life Time Achiement Award") सन्मानित करण्यात आले.

डॉ. पेजावर यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या परिषदेत डॉ. ज्ञानेश्वर वाघचौरे, नेपाळ राजदूत श्री. गोसावी, नेपाळ सरकारी विशेष राजदूत श्रीराम भगत, श्री.रामानंद भट्टराय, अध्यक्ष ग्लोबल सोसायटी फॉर बेसिबा अ‍ॅन्ड अ‍ॅप्लाइड सायन्स, डॉ. अनिता गोस्वामी गिरी, संशोधक इ. मान्यवर उपस्थित होते.

त्यांचे आजवर विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमधील (७७ शोधनिबंध), ४ लघुप्रकल्प, ५ मोठे प्रकल्प, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांच्या कॉनव्हेनर तसेच त्या होप व जिज्ञासा या सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या संस्थांचे सक्रीय सभासद आहेत.

त्या मुंबई विद्यापीठाच्या प्रथम महिला अधिष्ठाता देखील राहिल्या आहेत.तसेच ऑस्ट्रेलिया सरकारतर्फे "Executive Endeavor Fellowship", ठाणे गौरव पुरस्कार, पर्यावरण मित्र पुरस्कार इ. पुरस्कारांच्या त्या मानकरी ठरल्या आहेत.

गेल्या ३० वर्षात त्यांनी संशोधन क्षेत्रात केलेल्या कामगिरीची दखल म्हणजेच हा ''आंतरराष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार'' आहे. महाविद्यालयाच्या सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर सहकाऱ्यांतर्फे डॉ. माधुरी पेजावर यांचे हार्दिक अभिनंदन.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**ब्रीम्स चे प्राध्यापक डॉ. सतविंदर सिंग बेदी सर्वोत्कृष्ट प्राध्यापक पुरस्काराने सन्मानित**

डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेण्ट स्टडीज (BRIMS) च्या CCSD म्हणजेच Center for career and skill development विभागाचे प्रमुख डॉ. सतविंदर सिंग बेदी यांना ABP News या वृत्त संस्थेतर्फे दिल्या जाणाऱ्या २०१७ या वर्षीच्या राष्ट्रीय शैक्षणिक पुरस्कारांतर्गत (National Education Awards) Best Professor in Marketing Management या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.




Office automation industry, Tyre industry, Healthcare industry अशा विविध औद्योगिक क्षेत्रात २७ वर्षांचा अनुभव असलेल्या डॉ. सतविंदर सिंग बेदी यांना गेल्या वर्षी म्हणजेच २०१६ मध्ये देखील Dewang Mehta National Awards या राष्ट्रीय पुरस्कारांतर्गत Best Professor in Marketing Management याच पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

ब्रीम्स परिवारा तर्फे डॉ. सतविंदर सिंग बेदी यांचे हार्दिक अभिनंदन !

•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- ❉ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- ❉ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- ❉ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.